बैल पोळ्याच हा सण सर्जा राजाचा हा दिन
बळीराजा संगे जो राबतो रात्र-दिन
सांगा आम्हा कसे फेडावे तुझे हे ऋण
बैलपोळा
निमित्त सर्व शेतकरी बांधवांना मनःपुर्वक शुभेच्छा..!
-संपादक

दैनिक
# राज्य लोकतंत्र



www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव • लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१७१ | गुरूवार दि.१० सप्टेंबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## पिके संकटात; तातडीने पंचनामे करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश

### मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, विदर्भातील पावसाची तूट असलेल्या भागांवर विशेष लक्ष; पिकांना १२ तास वीज देण्याचे निर्देश

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील काही भागांत पावसाने मोठा खंड दिल्याने खरीप पिकांवर संकट निर्माण झाले आहे. पावसाअभावी पिकांचे नुकसान झालेल्या भागांत तातडीने पाहणी करून पंचनामे करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भातील पावसाची मोठी तूट असलेल्या भागांमध्ये पिकांची सद्य:स्थिती तपासून शेतकऱ्यांना आवश्यक मदत देण्यासाठी कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ज्या भागांत पावसाचा मोठा खंड पडला असून त्याचा पिकांवर परिणाम होण्याची शक्यता आहे, त्या भागांचे तातडीने सर्वेक्षण करण्याचे आदेश मुख्य सचिवांना देण्यात आल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.**



राज्यातील काही भागांत पावसाची तूट लक्षणीय आहे. विदर्भात सुमारे ३५ टक्के पाऊस कमी झाला असून मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातही पावसाचे प्रमाण कमी आहे. पावसाच्या दीर्घ खंडामुळे अनेक ठिकाणी खरीप पिकांसह पाण्याच्या उपलब्धतेची समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्याबरोबरच पिके वाचविण्यासाठी आवश्यक सिंचनाची व्यवस्था करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पिकांना पाणी देता यावे यासाठी दिवसाला १२ तास वीज उपलब्ध करून देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. तसेच जळालेले रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) तातडीने बदलून वीजपुरवठा सुरळीत करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. त्यामुळे पावसाची प्रतीक्षा करत असलेल्या शेतकऱ्यांना उपलब्ध पाण्याच्या माध्यमातून पिके वाचविण्याची संधी मिळणार आहे. याशिवाय ज्या भागांत पिके वाचविणे शक्य होणार नाही, तेथे सर्वेक्षण आणि पंचनामे करून नुकसान निश्चित केले जाईल. त्यानंतर शासनाच्या नियमानुसार शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याची कार्यवाही केली जाईल, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले. दरम्यान, परभणी, बीड, हिंगोली यांसह मराठवाड्यातील पावसाची तूट असलेल्या जिल्ह्यांसाठी स्वतंत्र पॅकेज किंवा विशेष उपाययोजना करण्यात येणार का, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. त्यावर सध्या सर्वप्रथम पंचनामे करणे महत्त्वाचे असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. पाऊस परतल्यास आणि पावसाची तूट भरून निघाल्यास परिस्थिती सुधारू शकते. मात्र, परिस्थिती गंभीर राहिल्यास शासनाकडून आवश्यक उपाययोजना केल्या जातील, असे त्यांनी स्पष्ट केले. राज्यातील उपलब्ध जलसाठ्याचे पान २ वर

## थोडक्यात...

### साखरेच्या किमतीवरून सरकारसमोर पेच

नवी दिल्ली : कारखान्यांमधील साखरेच्या विक्रमी किमती आणि संभाव्य तुटवड्यामुळे अटकळींना वाव मिळाला. सरकारने तुटवडा नाकारला आणि १० लाख टन कच्च्या साखरेच्या आयातीला मंजुरी दिली. आता, देशांतर्गत साखरेच्या किमतीत झालेल्या तीव्र घसरणीमुळे केंद्र सरकारने परवानगी दिलेल्या १० लाख टन साखरेच्या आयातीला अडथळा निर्माण झाला आहे. वाढत्या आंतरराष्ट्रीय किमती आणि घसरणा-या देशांतर्गत किमतींमुळे आयात केलेली साखर स्थानिक साखरेपेक्षा महाग झाली आहे, ज्यामुळे आयातदार आणि रिफायनर्सना ती विकणे कठीण झाले आहे. गेल्या काही आठवड्यांत, प्रमुख राज्यांमध्ये कारखान्यातील साखरेचे दर सुमारे ६५ रुपये प्रति किलोवरून ४४-५० रुपये प्रति किलोपर्यंत घसरले आहेत. यामुळे आयात केलेल्या साखरेचा खर्च आणि देशांतर्गत किमती यांच्यातील संतुलन बिघडले आहे.

### जरांगे पाटलांचे समर्थक, तसे आमच्या नेत्यांचेही समर्थक

छसंभाजीनगर : मनोज जरांगे यांच्या उपोषणाचा आज १२ दिवस असून सरकारने त्यांच्या १२ मागण्या मान्य केल्याचं मंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषद घेऊन सांगितलं होतं. मात्र, सरकारने एकही मागणी मान्य केली नसल्याचं सांगत जरांगे पाटलांनी मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर जोरदार टीका केली. त्याच पार्श्वभूमीवर आता सरकाराच्यावतीने मंत्री उदय सामंत आणि आमदार प्रसाद लाड यांनी पत्रकार परिषद घेऊन सरकारची बाजू मांडली. तसेच, जरांगे पाटलांच्या भाषेवरुन, जसे त्यांचे समर्थक तसे आमच्या नेत्यांचेही समर्थक असल्यां सामंत यांनी म्हटले. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या आदेशाने मी आणि प्रसाद लाड, आम्ही छत्रपती संभाजीनगरमध्ये प्रशासन, तथा आरक्षण समितीची बैठक घेतली. आत्तापर्यंत मराठा समाजासाठी जे काही काम केले त्यासाठी या बैठक होत्या.

### भारतरत्न डॉ. राव यांना निवडणूक आयोगाची नोटीस

नवी दिल्ली : ज्येष्ठ वैज्ञानिक आणि भारतरत्न पुरस्काराने सन्मानित प्रा. सी. एन. आर. राव (९२) यांना कर्नाटकातील मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरावलोकनादरम्यान नावात आढळलेल्या विसंगतीमुळे निवडणूक आयोगाने सुनावणीसाठी नोटीस बजावली आहे.त्यांच्या नावात झालेल्या किरकोळ फरकामुळे हे प्रकरण उपस्थित झाले आहे. २००२ च्या मतदार यादीत त्यांचे नाव 'प्रा. सी. एन. आर. राव' असे नोंदवण्यात आले आहे, तर सध्याच्या मतदार यादीत अतिरिक्त 'एफ' लागल्याची नोंद आहे. एसआयआर प्रक्रियेत मतदाराने २००२ च्या मतदार यादीच्या आधारे भरलेल्या गणना अर्जातील स्वत:च्या नावाची माहिती आणि सध्याच्या मतदार यादीतील नोंद जुळत नसल्यास त्याला 'स्व-नावातील विसंगती' मानले जाते.या प्रक्रियेनुसार, नोटीसमध्ये ज्या व्यक्तीचे नाव आहे, त्याच व्यक्तीला सुनावणीसाठी उपस्थित राहता येते. त्यामुळे प्रा. राव यांना स्वत:ची ओळख निश्चित करण्यासाठी प्रत्यक्ष सुनावणीला हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०८ सप्टेंबर २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: ५१.५० क्विंटल | २,६५१ | ३,००० | २,७७८ |
| ज्वारी/हायब्रिड: ४९.०० क्विंटल | २,६५० | ५,६२३ | ३,५२९ |
| मका/लोकल: ८.०० क्विंटल | २,४५३ | २,४५६ | २,४५४ |
| तूर : १.५० क्विंटल | ६,४०० | ६,४०० | ६,४०० |
| उडीद : १.५० क्विंटल | ८,३७० | ८,३७० | ८,३७० |
| बाजरी: ११४.०० क्विंटल | २,६२० | ३,१२१ | २,७९८ |
| मुग: ७.०० क्विंटल | ८,२१० | ९,५११ | ९,१४४ |
| सोयाबीन: २९.५० क्विंटल | ६,०११ | ६,०११ | ६,०११ |
| हरभरा: ४.०० क्विंटल | ६,००० | ६,१५० | ६,०७६ |

## कृषी विभागाच्या आकृतीबंधात फेरफारसाठी ५ कोटींची वसुली?

### भाजप आ.सुरेश धस यांच्या पत्राने पुन्हा खळबळ

बीड –पुणे । प्रतिनिधी

**कृषी विभागाचा सुधारित आकृतीबंध तयार करताना अतांत्रिक कर्मचाऱ्यांकडून कोट्यवधी रुपयांची वसुली करून आकृतीबंधात फेरफार केल्याचा खळबळजनक आरोप भाजप आमदार सुरेश धस यांनी केला आहे या संदर्भात कृषी विभागाचे आस्थापना उपसंचालक राजेश जाधव यांच्यावर तब्बल ५ कोटी रुपये गोळा केल्याचा गंभीर आरोप धस यांनी मुख्य सचिवांना दिलेल्या पत्रात केला आहे.**



सुरेश धस यांनी केलेल्या आरोपानुसार, कृषी विभागाचा आकृतीबंध बनवताना विविध पदांवरील कर्मचाऱ्यांकडून ठरावीक रकमा उकळण्यात आल्या यामध्ये:कनिष्ठ लिपिकांकडून: प्रत्येकी १०,००० ,वरिष्ठ लिपिकांकडून: प्रत्येकी १५,००० ,सहायक अधीक्षकांकडून: प्रत्येकी ५०,०००

कृषी अधीक्षकांकडून: प्रत्येकी,००,००० अशा प्रकारे गोळा केलेल्या एकूण ५ कोटी रुपयांपैकी ४ कोटी रुपये कृषी आयुक्त सुरज मांढरे यांच्यापर्यंत पोहोचवण्यात आले, तर १ कोटी रुपये राजेश जाधव यांनी स्वत:कडे ठेवल्याचा दावा आमदार सुरेश धस यांनी केला आहे या आरोपांवर 'माध्यमाद्वारे बोलताना उपसंचालक राजेश जाधव यांनी हे आरोप पान २ वर

## मनोज जरांगे पुन्हा एकेरीवर आले

### उपमुख्यमंत्री शिंदे, मंत्री शिरसाट, सामंत यांच्यावर सडकून टीका केली

जालना । प्रतिनिधी

मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा आज १२ वा दिवस आहे. मनोज जरांगे यांनी आज पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी सत्ताधाऱ्यांवर सडकून टीका केली. विशेष म्हणजे त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका करताना त्यांना मोठा इशारा दिला आहे. मराठ्यांना मराठ्यांच्या अंगावर सोडत असाल तर तुम्ही खूप लवकर संपाल, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला. यावेळी त्यांनी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री उदय सामंत यांच्यावरही निशाणा साधला. "तुम्हाला आरक्षण द्यायचं जिवावर



आलं. तुम्हाला मराठ्यांना संपवायचं आहे ही तुमची भूमिका आहे. तुम्ही छत्रपती संभाजीनगरला येऊन फक्त आंदोलन मोडीत काढण्याचं षडयंत्र करत आहात. तुम्ही हारलेले आहात. तुमचा नाकार्तेपणा सिद्ध झाला आहे. पान २ वर

### जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश अंतरवालीत दोन दिवस दारुबंदी

मनोज जरांगे यांच्या अंतरवालीतील मराठा आरक्षण आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार किंवा दंगल सदृश्य परिस्थिती होऊ नये यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून दोन दिवस म्हणजेच आज आणि उद्या अंतरवाली सराटी येत असलेल्या गोंदी पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये मध्ये विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे. मौजे अंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षणासंबंधी आंदोलन सुरू असून जमाव वाढण्याची शक्यता लक्षात घेता संबंधित गावांमध्ये शांतता भंग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दारुबंदीचे आदेश जारी केले आहेत.



## श्री तुळजाभवानीच्या सोन्यावरून पुन्हा वाद

धाराशिव । प्रतिनिधी

श्री तुळजाभवानी देवीच्या चरणी भक्तांनी अर्पण केलेले २४७ किलो सोने आणि ३,२९८ किलो चांदी वितळवण्याच्या प्रस्तावावरून वाद पुन्हा पेटला आहे. मंदिर प्रशासनाने सोने-चांदी वितळवण्यासाठी राज्याच्या विधी व न्याय विभागाकडे नव्याने परवानगी मागितली आहे.

या प्रकरणी समितीच्या वतीने अधिवक्ता (पू.) सुरेश कुलकर्णी आणि पान २ वर

## पार्थ पवारांना आरोपी का केलं नाही?

### हायकोर्टाचा पोलीस महासंचालकांना सवाल

पुणे । प्रतिनिधी

बहुचर्चित आणि तब्बल १८०० कोटींच्या मुंढवा जमीन खरेदी प्रकरणी स्थापन करण्यात आलेल्या समितीने आपला अहवाल विधिमंडळात सादर केला होता. विकास खारगे समितीने तब्बल ४ हजार ३९२ पानांचा जंबो अहवाल सभागृहासमोर ठेवला. या अहवालात कुणालाही स्पष्टपणे क्लीन चीट देण्यात आलेली नसून, अनेक अधिकारी आणि संबंधितांवर कारवाईची शिफारस करण्यात आली आहे. मात्र, पार्थ पवार यांच्यावरील कारवाईबाबत थेट उल्लेख नसल्याने त्यांच्यावर कारवाईची टांगती तलवार कायम होती. आता, याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने पोलिसांना सवाल केला आहे. पार्थ पवारांना आरोपी का केलं नाही, अशी विचारणा तपास अधिकाऱ्यांना केली.



राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा खासदार पार्थ पवार यांच्यावरील आरोपानंतर मुंढवा जमीन गैरव्यवहारप्रकरणी समोर आलेल्या अहवालात थेट आरोपी म्हणून पार्थ पवार यांचे नाव नाही. त्यामुळे, एकप्रकारे पार्थ यांना दिलासा मिळाला होता. मात्र, आता पार्थ यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. कारण, मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरणी पान २ वर

## भाजपला १,४७२.८ कोटी रुपयांची देणगी



नवी दिल्ली । वृतसंस्था

**पश्चिम बंगाल, आसाम, केरळ, तामिळनाडू आणि पुदुचेरी विधानसभा निवडणुकांच्या मागील टप्प्यात भाजपला एकूण १,४७२.८ कोटी रुपयांची देणगी मिळाली होती. आसाम, तामिळनाडू आणि पुदुचेरी विधानसभा निवडणुकांसाठी भाजपने निवडणूक आयोगाकडे सादर केलेल्या निवडणूक खर्चाच्या विवरणपत्रांमधून ही माहिती समोर आली आहे.**

६ मे रोजी निवडणुका पूर्ण झाल्यानंतर भाजपच्या खात्यातील पान २ वर

## आजपासून मराठवाड्यातील आठही जिल्ह्यात शिबिर

### मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री उदय सामंत, आ.प्रसाद लाड यांचा आठही जिल्हाधिकाऱ्यांशी संवाद



छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांमध्ये जात प्रमाण पत्राच्या वाटपात शून्य प्रलंबित्व ( झिरो पेडन्सी) ठेवण्यासाठी प्रशासनाने आज मराठवाड्यातील आठही जिल्ह्यातील प्रांत अधिकारी आणि जात पडताळणी अधिकाऱ्यांसोबत अडीच तास सविस्तर बैठक घेतली. १० सप्टेंबर पासून संपूर्ण मराठवाड्यात ८ जिल्ह्यात शिबिर आयोजित करण्यात आले असून एकही प्राप्त अर्ज निर्णयाविना शिल्लक राहणार नाही,असे उद्दिष्ट देण्यात आले.

जात प्रमाणपत्र वाटपासाठी प्रशासनाने युद्धपातळीवर प्रयत्न सुरू केले असून आज आठही जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत प्रांताधिकारी आणि जात पडताळणी अधिकारी यांनाही बैठकीमध्ये समाविष्ट करण्यात आले होते. मराठा आरक्षण मंत्रिमंडळ पान २ वर



अग्रलेख

# एआयच्या युगात पत्रकारिता विकायची नाही, वाचवायची आहे!

माहितीचा स्फोट झाला आहे; पण सत्याचा दुष्काळ पडत चालला आहे. हातातील मोबाईलवर क्षणार्धात हजारो बातम्या येतात, कृत्रिम बुद्धिमत्ता काही सेकंदांत माहितीचा डोंगर उभा करते आणि सोशल मीडियावर प्रत्येकजण स्वतःला पत्रकार समजू लागला आहे. अशा गोंधळाच्या काळात विश्वासार्ह पत्रकारिता नेमकी कुठे उभी आहे, हा प्रश्न अधिक गंभीर झाला आहे. या पार्श्वभूमीवर 'द इंडियन एक्सप्रेस ग्रुप' आणि 'ओपनएआय' यांच्यातील जागतिक धोरणात्मक भागीदारी निश्चितच महत्त्वाची आहे. पण या भागीदारीचे स्वागत करताना एक मूलभूत प्रश्न विचारायलाच हवाएआय पत्रकारितेला बळ देणार आहे की हळूहळू पत्रकारितेचीच जागा घेणार आहे?

या प्रश्नाचे उत्तर आजच स्पष्टपणे ठरवावे लागेल. कारण तंत्रज्ञान तटस्थ असते, असे मानणे धोकादायक आहे. तंत्रज्ञानाचा वापर कोण करतो, कोणत्या उद्देशाने करतो आणि त्याच्या निर्णयांवर नियंत्रण कोणाचे असते, यावर त्याचे परिणाम ठरतात. इंटरनेटवर माहितीचा महासागर आहे; पण त्या महासागरात सत्य किती आणि कचरा किती, हे ओळखणे कठीण झाले आहे. खोटी माहिती, अर्धसत्य, बनावट छायाचित्रे, डीपफेक व्हिडिओ, कृत्रिमरीत्या तयार केलेले लेख आणि राजकीय प्रचार यामुळे सामान्य वाचक अक्षरशः गोंधळून जात आहे. अशा वेळी एआय प्रणालींनी विश्वासार्ह वृत्तसंस्थांच्या मूळ पत्रकारितेकडे वाचकांना नेणे ही सकारात्मक बाब ठरू शकते. मात्र इथेच पत्रकारितेच्या स्वायत्ततेचा प्रश्न निर्णायक ठरतो. बातमी कोणती असावी, कोणत्या प्रश्नाला प्राधान्य मिळावे आणि सत्तेला कोणते प्रश्न विचारले जावेत, हे अल्गोरिदमने ठरवायचे नाही. हे काम संपादक आणि पत्रकारांचेच असले पाहिजे. पत्रकारिता ही केवळ माहितीची मांडणी नाही. ती सत्तेवर नजर ठेवण्याची व्यवस्था आहे. ती दुर्बलांचा आवाज आहे. ती प्रशासनाला जाब विचारते. ती लोकप्रिय नसलेला पण आवश्यक प्रश्न विचारते. एआयकडे वेग असू शकतो; पण पत्रकारितेकडे विवेक असला पाहिजे. यामुळे 'संपादकीय स्वायत्तता कायम राहणार' ही बाब या भागीदारीतील सर्वांत महत्त्वाची अट आहे. कारण उद्या एआयने कोणती बातमी अधिक लोकप्रिय आहे, कोणता मजकूर अधिक क्लिक मिळवतो किंवा कोणत्या विषयाला अधिक प्रतिसाद मिळतो यावरून माहितीचे प्राधान्यक्रम ठरवायला सुरुवात केली, तर पत्रकारिता नकळत 'लोकांना काय हवे?' या बाजारू प्रश्नाच्या कैदेत जाईल. पत्रकारितेचा खरा प्रश्न मात्र 'लोकांना काय माहित असणे आवश्यक आहे?' हा आहे. हा फरक अत्यंत महत्त्वाचा आहे. आज माध्यमांसमोर आधीच जाहिरातींचे दडपण, मालकी हक्कांचे केंद्रीकरण, राजकीय दबाव आणि सोशल मीडिया अल्गोरिदमची स्पर्धा अशी अनेक आव्हाने आहेत. त्यात एआयचे सामर्थ्य जोडले जात असताना माध्यमांनी स्वतःची संपादकीय मणक्याची हाडे मजबूत ठेवली नाहीत, तर उद्याची पत्रकारिता 'क्लिक', 'ट्रेंड' आणि 'एंगेजमेंट'च्या आकड्यांमध्ये हरवण्याचा धोका आहे. एआय बातमीचा वेग वाढवू शकतो. मोठ्या प्रमाणातील कागदपत्रांचे विश्लेषण करू शकतो. माहिती शोधण्यास मदत करू शकतो. भाषांतर, डेटा विश्लेषण आणि तथ्य पडताळणीसारख्या कामांमध्ये पत्रकारांची क्षमता वाढवू शकतो. पण एखाद्या शेतकऱ्याच्या डोळ्यातील अस्वस्थता, एखाद्या कामगाराच्या अन्यायाची वेदना किंवा सत्तेच्या दडपणाखाली दबलेला आवाज समजून घेण्यासाठी केवळ डेटाची गरज नसते; मानवी संवेदनशीलतेची गरज असते. म्हणूनच एआयला पत्रकारितेचा मालक बनवण्याऐवजी पत्रकारितेचा सहकारी बनवणे आवश्यक आहे. आणखी एक मुद्दा तितकाच महत्त्वाचा आहेमूळ स्रोताचे श्रेय आणि वाचकाचा अधिकार. एआयने एखाद्या वृत्तसंस्थेच्या मेहनतीवर आधारित उत्तर दिले, तर त्या पत्रकारितेचा मूळ स्रोत स्पष्टपणे दाखविला गेला पाहिजे. पत्रकारांनी केलेल्या तपासाला अदृश्य करून एआयने केवळ अंतिम उत्तर देणे हा न्याय नाही. पत्रकारितेच्या मागे वेळ, पैसा, जोखीम आणि मानवी श्रम असतात. त्या श्रमाचे श्रेय आणि वाचकाला मूळ बातमीपर्यंत जाण्याचा अधिकार अबाधित राहिला पाहिजे. आज एआयबद्दल उत्साह आहे. उद्या त्याची भीतीही वाटू शकते. पण भीतीने तंत्रज्ञान रोखता येणार नाही आणि अंध उत्साहाने पत्रकारिता वाचणारही नाही. मार्ग एकचतंत्रज्ञान स्वीकारायचे, पण पत्रकारितेची मूल्ये गहाण ठेवायची नाहीत. इंडियन एक्सप्रेस समूह आणि ओपनएआय यांची भागीदारी या दृष्टीने एक प्रयोग आहे. हा प्रयोग यशस्वी ठरण्याची खरी कसोटी किती लोकांपर्यंत बातमी पोहोचली यात नसून, किती लोकांपर्यंत अचूक, संदर्भयुक्त आणि स्वतंत्र माहिती पोहोचली यात आहे. कारण शेवटी एआय किती बुद्धिमान आहे हा प्रश्न दुय्यम आहे. लोकशाहीसाठी खरी चिंता ही आहे की पत्रकारिता किती स्वतंत्र राहिली आहे. तंत्रज्ञान बदलत राहील. प्लॅटफॉर्म बदलतील. माध्यमांचे स्वरूप बदलेल. पण सत्तेला प्रश्न विचारण्याचे धैर्य, सत्य शोधण्याची जिद्द आणि वाचकाप्रती असलेली नैतिक जबाबदारी बदलता कामा नये. एआयचे युग येत आहे; ते थांबवण्याची गरज नाही. पण या युगात पत्रकारितेचा आत्मा विकला जाऊ नये, एवढी खबरदारी मात्र घ्यावीच लागेल. कारण माहितीचे यंत्रमानवीकरण झाले तरी सत्याला शेवटी माणसाचाच आवाज लागतो.

# बीडमध्ये एलसीबीची मोठी कारवाई: कारमधून ७० किलो गांजा जप्त

## अमरावतीच्या तस्कराला बेड्या; बीड शहर पोलिसांत गुन्हा दाखल

**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहरात अवैधरीत्या गांजाची चोरटी विक्री व वाहतूक करणाऱ्या तस्करांवर स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई केली आहे. शहरातील खासबाग मंदिर रोड परिसरात सापळा रचून पांढऱ्या रंगाच्या क्रेटा कारमधून तब्बल ७० किलो गांजा जप्त करण्यात आला असून, वाहनासह एकूण ५० लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे. याप्रकरणी अमरावती येथील एका आरोपीस अटक करण्यात आली आहे.**

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने व त्यांचे पथक बीड शहरात पेट्रोलिंग करत होते. या दरम्यान, खासबाग मंदिर रोड परिसरात एका पांढऱ्या रंगाच्या क्रेटा कारमधून अवैध गांजाची विक्री करण्यासाठी चोरटी वाहतूक होणार असल्याची गोपनीय माहिती पथकाला मिळाली. मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे पोलिसांनी तात्काळ परिसरात सापळा लावला. संशयित क्रेटा कार येताच पोलिसांनी ती अडवून तिची कसून झडती घेतली. त्यावेळी कारमध्ये वेगवेगळ्या गोण्यांमध्ये बांधून ठेवलेला तब्बल ७० किलो अंमली पदार्थ (गांजा) आढळून आला. जप्त करण्यात आलेल्या गांजाची बाजारातील किंमत सुमारे ३५ लाख रुपये आणि




वाहतुकीसाठी वापरलेली १५ लाख रुपये किमतीची क्रेटा कार, असा एकूण ५० लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. या प्रकरणी गांजाची वाहतूक करणारा आरोपी मोसीन खान वाहब शेख (वय ३१ वर्षे, रा. ताज नगर, ता. जि. अमरावती) याला पोलिसांनी ताब्यात घेऊन अटक केली आहे.

याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने यांच्या फिर्यादीवरून बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर १९१/२०२६ नुसार अमली पदार्थ विरोधी कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास बीड शहर पोलीस करत आहेत. सदरची धडक कामगिरी बीडचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत आणि अपर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोनि. शितलकुमार बल्लाळ, बीड शहर पोलीस ठाण्याचे सपोनि. लंके, पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस हवालदार महेश जोगदंड, दिलीप गिते, बप्पासाहेब घोडके, चालक पोलीस हवालदार गणेश मराडे तसेच बीड शहर पोलीस ठाण्याचे पोह. घुगे, परजने, चालक शौकत शेख आणि सचिन अलगट यांनी संयुक्तपणे सहभाग घेतला. पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे जिल्ह्यातील अवैध अंमली पदार्थ तस्करांचे धाबे दणाणले आहेत.

# मटका जुगारावर शिवाजीनगर पोलिस व परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक भारत पांढरे यांच्या संयुक्त पथकाचा छापा; १ लाख २३ हजारांचा मुद्देमाल जप्त



**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी माननीय पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कावत यांनी सर्व पोलीस अधिकारी व अंमलदारांना अवैध धंद्यांवर छापे टाकून प्रभावी कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या सूचनांच्या अनुषंगाने शिवाजीनगर पोलिसांकडून अवैध धंद्यांविरुद्ध सातत्याने कारवाई करण्यात येत आहे.**

परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक श्री. भारत पांढरे व पोलीस निरीक्षक श्री. शितलकुमार बल्लाळ हे पोलीस अंमलदार पोह/१६६४ रवींद्र आघाव व पोशि/२७३ नवनाथ डाके यांच्यासह गस्त करत असताना, पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांना गोपनीय बातमीदारामार्फत कॅनाल रोड, नगर नाका, बीड येथे एक इसम स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी आकड्यांवर पैसे लावून विनापरवाना बेकायदेशीररीत्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवीत असल्याची माहिती मिळाली. माहितीची खात्री करून शिवाजीनगर पोलीस स्टेशन व परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक भारत पांढरे यांच्या संयुक्त पथकाने दोन पंचांना सोबत घेऊन कॅनाल रोड, नगर नाका येथे छापा टाकला. यावेळी हमेद खान नादेर खान, वय २९ वर्षे, रा. अमराई, बालेपीर नगर रोड, बीड हा सार्वजनिक ठिकाणी लोकांकडून पैसे घेऊन चिठ्ठीवर आकडे लिहून देताना आढळून आला. त्याच्याकडून १३ हजार रुपये रोख रक्कम, एक चिटबुक, कार्बनचा तुकडा व काळ्या रंगाचा बॉलपेन, तसेच १ लाख रुपये किमतीची बर्गमन कंपनीची स्कुटी क्र. २३ ४४८७ आणि १० हजार रुपये किमतीचा ओपो कंपनीचा मोबाईल, असा एकूण १ लाख २३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी हमेद खान नादेर खान तसेच गुंड पाटील, पूर्ण नाव माहीत नाही, रा. बीड यांच्याविरुद्ध कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. सदरची उल्लेखनीय कारवाई माननीय पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कावत, अपर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख आणि उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. व्यंकट राम यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली, परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक श्री. भारत पांढरे, पोलीस निरीक्षक श्री. शितलकुमार बल्लाळ तसेच पोह/१६६४ रवींद्र आघाव व पोशि/२७३ नवनाथ डाके यांच्या पथकाने अत्यंत शिताफीने व यशस्वीरीत्या पार पाडली आहे.

# मराठा-कुणबी प्रमाणपत्राचे विशेष शिबिर नायगाव किंवा निरगुडी येथे घ्यावे

## ॲड. प्रकाश विठ्ठलराव कवठेकर यांची तहसीलदारांकडे मागणी



**पाटोदा । प्रतिनिधी**

**मराठा-कुणबी प्रमाणपत्र मिळविण्यासाठी आयोजित करण्यात आलेले विशेष शिबिर थेरला येथे न घेता नायगाव अथवा निरगुडी येथे आयोजित करण्यात यावे, अशी मागणी माजी जिल्हा परिषद सदस्य ॲड. प्रकाश विठ्ठलराव कवठेकर यांनी मा. तहसीलदार, पाटोदा यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.**

मराठा-कुणबी प्रमाणपत्रासाठी पात्र नागरिकांना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून प्रमाणपत्राची प्रक्रिया सुलभतेने पूर्ण करता यावी, यासाठी प्रशासनाच्या वतीने विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. मात्र सदर शिबिराचे ठिकाण थेरला येथे निश्चित करण्यात आल्याचे समजते. थेरला ऐवजी नायगाव किंवा निरगुडी येथे शिबिर आयोजित केल्यास नायगाव, निरगुडी तसेच परिसरातील अनेक गावांतील नागरिकांना त्याचा मोठ्या प्रमाणात लाभ मिळू शकतो. नागरिकांचा प्रवासाचा वेळ व खर्च वाचून प्रमाणपत्राची प्रक्रिया अधिक सुलभ होण्यास मदत होईल. नागरिकांची सोय व हित लक्षात घेऊन प्रशासनाने शिबिराच्या ठिकाणाचा फेरविचार करून नायगाव अथवा निरगुडी येथे विशेष शिबिर आयोजित करावे, अशी मागणी ॲड. प्रकाश विठ्ठलराव कवठेकर यांनी केली आहे. प्रशासनाने या मागणीचा सकारात्मक विचार करून योग्य ती कार्यवाही करावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.



**बीड: कल्याण येथील आयोजित भगवानबाबा जयंती उत्सवावेळी प्रख्यात किर्तनकार तथा ज्ञानेश्वरी प्रवचनकार ह.भ.प . अर्जन खाडे महाराज आळंदीकर यांचे समवेत सेवानिवृत केंद्र प्रमुख श्री.व सौ.आनिल जाधवर**

## पान १ वरून...

### पिके संकटात; तातडीने पंचनामे

वर्षभराचे नियोजन करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. जलसंपदा विभागाच्या अखत्यारीतील विविध जलसाठ्यांमध्ये सध्या किती पाणी उपलब्ध आहे आणि त्याचा पुढील काळात कोणत्या पद्धतीने वापर करता येईल, याचे नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पावसाची तूट असलेल्या भागांत उपलब्ध पाणी जपून वापरणे आणि शेतीसाठी त्याचा योग्य पद्धतीने उपयोग करणे आवश्यक असल्याचेही बावनकुळे यांनी सांगितले. त्यामुळे आगामी काळात पावसाची स्थिती आणि पिकांची परिस्थिती पाहून शासनाकडून पुढील निर्णय घेतले जाण्याची शक्यता आहे.

-----------------

### मनोज जरांगे पुन्हा

तुम्ही सपशेल हारले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मराठ्यांना आरक्षण देऊच शकत नाही हे तुम्ही स्पष्ट संगायला पाहिजे'', असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.''उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी मंत्री संजय शिरसाट यांच्याकडून प्रमाणपत्र रद्द करुन घेतले. तेव्हा तुमचे मराठे कुठे गेले? तुम्ही म्हणता ना त्यांच्याकडेदेखील मराठा समर्थक आहेत. तुमचेच मराठ्यांचे प्रमाणपत्र रद्द झाले ना? जे समर्थक समोर येत आहेत, शिंदे त्यांना समोर आणत आहेत. जात प्रमाणपत्र रद्द व्हायला लागले असताना मराठ्यांना कळत नाही का संजय शिरसाटांना बोलायला पाहिजे. तुमची जातच पक्ष आहे का? जे शिंदेंचे समर्थक आहेत त्यांनी प्रमाणपत्र रद्द केले त्यांना सांगावं'', असं मनोज जरांगे म्हणाले.''एकनाथ शिंदेंना म्हणावं की, हे नाटकं खेळू नका. मराठेच मराठ्यांच्या अंगावर सोडायचं हे नाटक खेळू नका. असं केलं तर खूप लवकर संपाल. एकनाथ शिंदेंना म्हणा, लवकर शहणे व्हा. आणखी हातातून गेलं तर एका फटक्यात संपाल'', अशा इशारा जरांगे यांनी दिला.''तुम्ही संभाजीनगरमध्ये बसून दंगल करायचं ठरवलं आहे. मी हे परवा सांगितलं आहे. हे सगळ्यांचं मिळून षडयंत्र आहे. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे वेगळे लोकं चर्चेला यायचे आणि मंत्री उदय सामंत यांच्याकडे वेगळे लोकं चर्चेला यायचे. एकनाथ शिंदेंना मराठा मराठ्यात मारामाऱ्या लावायच्या आहेत. याला पूर्ण एकनाथ शिंदे जबाबदार राहणार आहेत'', असा घणाघात मनोज जरांगे यांनी केला.''संयम सोडून तुम्ही मराठ्यांचं काय करणार? महाविकास आघाडीसह तुम्ही एकत्र या. येत्या १२ सप्टेंबरला निर्णय होणारच आहे. उदय सामंत यांना दोन महिन्यांपासून सांगतोय की, प्रमाणपत्र द्या. एकनाथ शिंदे आणि माझे संबंध पहिल्यारखे राहतील. तुमची तळमळ तुमच्या नेत्यासाठी, माझी तळमळ मराठ्यांच्या लेकरांसाठी आहे. तुमच्यात आणि आमच्यात हा फरक आहे'', असं जरांगे म्हणाले. ''तुम्हाला नीट बोलून काय करायचं? तुम्ही कोणती भाषा आहे? पाच-पन्नास गुंड आणणार? ते काय करणार? आमचे लोकंदेखील त्यांना ठेचणार. आमच्या मराठ्यांची लेकरं मरायला लागले. एकनाथ शिंदे आणि संजय शिरसाट यांनी ठरवून जात प्रमाणपत्र रद्द केलं आहे. याबाबत शिक्कामोर्तब झालं आहे'', असा आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे.

---------------

### कृषी विभागाच्या आकृतीबंधात

फेटाळून लावले आहेत ते म्हणाले, ''गेल्या दोन-तीन दिवसांपासून मी पेसा भरती, गट 'क' संवर्गाची नियमित भरती व आकृतीबंधाच्या संदर्भात मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील महत्त्वाच्या बैठकांसाठी मुंबईत व्यस्त होतो या आरोपांबाबत मला कोणतीही पूर्वकल्पना नाही. मुख्य सचिव किंवा वरिष्ठ पातळीवर या तक्रारीची चौकशी होईल आणि त्यातून सत्य समोर येईल , मात्र आमदार सुरेश धस यांचे पत्र सोशल मीडियावर जे व्हायरल झाले आहे त्यावरून पुन्हा एकदा आमदार दस यांनी भ्रष्टाचाराविरुद्ध आपला आवाज उठवला आहे या संदर्भात त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला मात्र संपर्क होऊ शकला नाही हे पत्र आजचे आहे की जुने याबाबत मात्र स्पष्टता होऊ शकली नाही

---------------

### भाजपला १,४७२.८

अखेरची शिल्लक ७,६२७.२ कोटी रुपये झाली. १५ मार्च २०२६ रोजी ही शिल्लक ६,७२२.६ कोटी रुपये होती. त्यामुळे या कालावधीत पक्षाच्या शिल्लकीत ९०४.६ कोटी रुपयांची वाढ झाली. आसाम, तामिळनाडू आणि पुद्दुचेरी विधानसभा निवडणुकांसाठी भाजपने संबंधित राज्य आणि जिल्हा कार्यकारणीच्या माध्यमातून एकूण १६० कोटी रुपये खर्च केले.यामध्ये आसाममध्ये सर्वाधिक ९६.३ कोटी रुपये, तामिळनाडूमध्ये ५१.६ कोटी रुपये, तर पुद्दुचेरीमध्ये ११.९ कोटी रुपये खर्च करण्यात आले. या तीन राज्यांतील निवडणुकांमध्ये भाजपने सामान्य पक्षप्रचारावर १३०.४ कोटी रुपये खर्च केले. दरम्यान, पश्चिम बंगाल आणि केरळ विधानसभा निवडणुकांसाठी भाजपच्या निवडणूक खर्चाची विवरणपत्रे अद्याप निवडणूक आयोगाने सार्वजनिक केलेली नाहीत.आसाममधील भाजपच्या निवडणूक खर्चाच्या विवरणपत्रानुसार, पक्षाने सामान्य पक्षप्रचारावर ७६.७ कोटी रुपये खर्च केले. यामध्ये भाजपने केलेल्या २३.१ कोटी रुपयांच्या खर्चाचा समावेश आहे. याशिवाय उमेदवारांसाठी १९.५ कोटी रुपये खर्च करण्यात आले. आसाममध्ये स्टार प्रचारकांच्या प्रवासासाठी २७.३ कोटी रुपये, जाहिरातींसाठी ३७ कोटी रुपये, प्रचार साहित्यावर ८.९ कोटी रुपये, तर इतर खर्चासाठी २.३ कोटी रुपये खर्च करण्यात आले.

-------------

### पार्थ पवारांना आरोपी

पार्थ पवार यांच्यावर गुन्हा का दाखल करण्यात आला नाही, त्यांना का आरोपी केले नाही, असा सवाल मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्र पोलिसांना केला. तसेच, पोलीस महासंचालकांसह तपास अधिकाऱ्यांनाही उत्तर देण्याचे आदेश दिले आहेत. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती माधव जामदार यांच्या एकलपिठाने हे आदेश दिले असून याप्रकरणी पुढील सुनावणी २८ सप्टेंबरला होणार आहे. दरम्यान, खारगे समितीच्या अहवालात पार्थ पवार यांच्यावरील कारवाईबाबत थेट उल्लेख करण्यात आलेला नाही. मात्र, भविष्यातील फौजदारी तपासात अधिक लोकांचा सहभाग आढळल्यास त्यांच्यावरही कारवाई होऊ शकते, असे समितीने नमूद केले आहे.मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरणी विकास खारगे समितीने या प्रकरणी एकूण ७ बैठका घेतल्या असून, अहवालासाठी तीन वेळा मुदतवाढ देण्यात आली होती. या प्रकरणाशी संबंध असलेले तहसीलदार आणि सहायक दुय्यम निबंधक यांच्या बडतर्फीची शिफारस करण्यात आली आहे.पुण्यातील मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरणी पार्थ पवारांना आरोपी का करण्यात आले नाही? असा सवाल मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्र पोलिसांना विचारला आहे. मुंढवा जमीन गैरव्यवहारप्रकरणी न्यायालयात दाखल याचिकेवर सुनावणी झाली, त्यावेळी हायकोर्टाने पोलीस महासंचालकांसह, तपास अधिकाऱ्यांना धारेवर धरले. त्यामुळे, खासदार पार्थ पवारांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे.

----------------

### श्री तुळजाभवानीच्या

अधिवक्ता उमेश भडगावकर यांनी धाराशिवचे जिल्हाधिकारी, राज्याचे मुख्य सचिव, गृह सचिव आणि विधी व न्याय विभागाच्या सचिवांना न्यायालयाच्या अवमानाची नोटीस बजावली आहे. ठराव मागे न घेतल्यास संबंधित अधिका-यांविरोधात त्यांच्या वैयक्तिक क्षमतेत फौजदारी अवमान याचिका दाखल करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.मात्र, मंदिर प्रशासनाने हा आरोप फेटाळला आहे. गुन्ह्यातील सोन्याला हात लावला जाणार नसून, त्याव्यतिरिक्त असलेले सोने-चांदी वितळवण्यासाठीच शासनाची परवानगी मागण्यात आली आहे, अशी भूमिका तुळजाभवानी देवस्थानच्या व्यवस्थापक माया माने यांनी स्पष्ट केली.हिंदू जनजागृती समितीच्या म्हणण्यानुसार, १ जानेवारी २०१० ते १० जून २०२३ या कालावधीत अर्पण झालेले सोने वितळवण्याची परवानगी मिळावी, यासाठी मंदिर संस्थानाने उच्च न्यायालयात अर्ज केला होता. मात्र, २३ जानेवारी २०२५ रोजी न्यायालयाने हा अर्ज फेटाळला. संबंधित प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने अंतरिम आदेशात बदल करणे योग्य ठरणार नाही, अशी न्यायालयाची भूमिका असल्याचे समितीने म्हटले आहे. त्यामुळे त्याच विषयावर नव्याने ठराव करून शासनाकडे परवानगी मागणे कायदेशीरदृष्ट्या चुकीचे असल्याचा समितीचा दावा आहे. प्रशासन मात्र सध्याचा प्रस्ताव न्यायालयीन प्रकरणातील सोन्याशी संबंधित नसल्याचे सांगत आहे.

----------

### आजपासून मराठवाड्यातील

उपसमितीचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत, आमदार प्रसाद लाड यांच्या उपस्थितीत छत्रपती संभाजीनगरच्या स्मार्ट सिटी कार्यालयात सकाळी ११ पासून अडीच तासाची मॅरेथॉन बैठक घेण्यात आली. कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेत अधिक पारदर्शकता, सुलभता आणि गती आणावी. प्रशासनाकडून करण्यात येत असलेल्या कामाची अद्ययावत आकडेवारी दररोज प्रसारमाध्यमांद्वारे जनतेपर्यंत पोहोचवावी. तसेच नामंजूर अर्जांची कारणे स्पष्टपणे सार्वजनिक करावीत. प्रलंबित प्रकरणांचा निपटारा जलदगतीने करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ वाढवून कार्यपद्धतीत सुधारणा कराव्यात, असे निर्देश उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत यांनी या बैठकीत दिले.या बैठकीला जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील मुंबईतून सहभागी झाले होते. कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्याच्या कार्यपद्धतीतील त्रुटी व अडचणींवर चर्चा करण्यासाठी उच्चस्तरीय समितीची बैठक स्मार्ट सिटी कार्यालयात झाली. या बैठकीला मुंबईहून दूरदृश्यप्रणालीद्वारे मराठा आरक्षण मंत्रीमंडळ उप समितीचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री डॉ राधाकृष्ण विखे पाटील उपस्थित होते. स्मार्ट सिटी कार्यालय येथे मराठी भाषा व उद्योग मंत्री उदय सामंत, आमदार प्रसाद लाड, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी विनय गौडा, जालना जिल्हाधिकारी अशिमा मित्तल,बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, छत्रपती संभाजीनगरचे पोलीस आयुक्त प्रवीण पवार, जालना पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, सहआयुक्त मंजुषा मिसकर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. परभणी, नांदेड, लातूर धाराशीव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

-------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि. १० सप्टेंबर २०२६



## थोडक्यात



### इकरा पब्लिक स्कूलमध्ये शिक्षक दिन उत्साहात साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

येथील इकरा पब्लिक स्कूलमध्ये दि ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन मोठ्या उत्साहात व आनंदाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक शेख तौसिफ रफीक उपस्थित होते.यावेळी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षक दिनानिमित्त शाळेच्या वतीने सर्व शिक्षकांचा पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनीही आपल्या शिक्षकांना भेटवस्तू देत त्यांच्याप्रती आदर व कृतज्ञता व्यक्त केली.यावेळी इयत्ता चौथी, पाचवी व सहावीच्या विद्यार्थ्यांनी टीचर्स डे ॲक्टिव्हिटीमध्ये उत्साहाने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका साकारत वर्गात अध्यापन केले. शिक्षक बनून अध्यापन करण्याचा विद्यार्थ्यांचा हा उपक्रम उपस्थितांसाठी विशेष आकर्षण ठरला.कार्यक्रमाच्या शेवटी शिक्षकांच्या कार्याचे कौतुक करण्यात आले. सर्व शिक्षक, विद्यार्थी व कर्मचाऱ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे शिक्षक दिनाचा कार्यक्रम आनंदात व उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.




### शिव, वैष्णव भेद करू नये ; परमात्मा एकच आहेत –ह.भ.प. रामेश्वर महाराज थोरबोले

बीड । प्रतिनिधी

लाखो वर्ष शिव व वैष्णव यांच्यामध्ये अनेक जण भेदाभेद करतात अनेक पिढ्या या संघर्षामध्ये बरबाद झाल्या धर्मजाती पंतांच्या पुढे अनेकांचे आयुष्य उध्वस्त झाले परमात्मा एक आहे तो सर्वांच्या हृदयामध्ये वास करतो संत तुकाराम महाराज म्हणतात की हरीहरात शिव आणि वैष्णव असा भेद करू नये या जगात परम तत्व परमात्मा एकच आहे. ती फक्त वेगवेगळ्या रूपाने आपल्यासमोर असते म्हणून शिव,वैष्णव भेद करू नये असे ह.भ.प. रामेश्वर महाराज थोरबोले यांनी कीर्तन सेवेत अभंग विवेचन केले. श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे सदगुरू ह.भ.प. वै.किसन बाबा महाराज यांच्या पासून नित्य नियमाने प्रत्येक एकादशी दिवशी व श्रावण सोमवारी कीर्तनाचे आयोजन केले जात आहे गुरुवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली एकादशीचे कीर्तन ह.भ.प. रामेश्वर महाराज थोरबोले यांची होती. श्रावण सोमवार निमित्त श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे दुपारी कीर्तन सेवा ह.भ.प. अचित महाराज रेडे सिद्धेश्वर संस्थान देवळा यांचे संपन्न झाले. जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचे विवेचन करताना थोरबोले महाराज पुढे म्हणाले की आज शिवशंकर महादेवाचा श्रावण सोमवार आहे व पांडुरंग नारायणाची एकादशी आहे अनेक जण नारायण आणि शिवशंकरामध्ये भेद करतात हा भेद योग्य नसून ही दोन्हीही रूप सृष्टीचा पालन करणाऱ्या परमात्म्याची आहेत असे थोरबोले महाराज म्हणाले यावेळी श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे टाळकरी, माळकरी, भजनी मंडळी ,गायनाचार्य, मृदंगाचार्य यांच्या सह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दुकाने रस्त्यावर, वाहनांची कोंडी, अन् चोरट्यांना संधी! मोबाईल चोरीच्या संशयावरून नागरिकांनी एकाला पकडले

**पाटोदा । प्रतिनिधी**

**बैलपोळ्यानिमित्त पाटोदा शहरातील वांजरा नदीवरील पुल परिसरात भरलेल्या बाजारात मोठ्या प्रमाणावर गर्दी उसळली असताना मोबाईल चोरीचा प्रयत्न 'केल्याचा संशय असलेल्या एका व्यक्तीला नागरिकांनी पकडून पोलिसांच्या स्वाधीन केल्याची घटना घडली. या प्रकारामुळे गर्दीच्या बाजारात नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.**

बैलपोळ्याच्या पार्श्वभूमीवर परिसरात मोठ्या प्रमाणात दुकाने थाटण्यात आली होती. वांजरा नदीवरील पुलाच्या दोन्ही बाजूंना दुकाने लागल्याने रस्ता अरुंद झाला असून, त्याच मार्गावरून वाहनांची सतत ये-जा सुरू आहे. परिणामी दिवसभर मोठी वाहतूक कोंडी होत असून बाजारात पादचाऱ्यांची मोठी गर्दी होत आहे.

याच गर्दीत एका व्यक्तीच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने त्याच्यावर मोबाईल चोरीचा प्रयत्न केल्याचा संशय नागरिकांना आला. नागरिकांनी त्याला पकडले. यावेळी काही नागरिकांनी त्याला मारहाण केल्याचे सांगण्यात येत असून, त्यानंतर त्याला पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. या प्रकरणातील नेमका प्रकार काय घडला, याचा तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

**गर्दी वाढतेय, पण सुरक्षा व्यवस्था कुठे?**



बैलपोळा बाजारात मोठ्या संख्येने नागरिक येत असल्याने गर्दीच्या ठिकाणी पुरेसा पोलिस बंदोबस्त असणे आवश्यक आहे. मात्र, वाहतूक कोंडी आणि गर्दीमुळे पुल परिसरात नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

मोबाईल चोरी, महिलांच्या दागिन्यांची चोरी आणि पाकीटमारीसारख्या घटनांना आळा घालण्यासाठी साध्या वेशातील पोलिसांची नियुक्ती, संशयित हालचालींवर लक्ष आणि गर्दीच्या ठिकाणी अतिरिक्त बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

दुकाने हटवा नाही तर वाहतुकीचे नियोजन करा!

पुलाच्या दोन्ही बाजूंना थाटण्यात आलेल्या दुकानांमुळे रस्ता मोठ्या प्रमाणात अरुंद झाला आहे. त्यातच वाहनांची ये-जा सुरू असल्याने वाहतूक कोंडीची समस्या गंभीर झाली आहे. त्यामुळे बाजाराच्या कालावधीत वाहनांसाठी स्वतंत्र मार्ग, पार्किंग व्यवस्था आणि पादचाऱ्यांसाठी मोकळी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी होत आहे.

**सीसीटीव्हीची नजर, पोलिसांचा पहारा हवा**

बाजार परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत आहेत की नाही, याची तपासणी करून संवेदनशील ठिकाणी अतिरिक्त कॅमेरे बसवावेत. तसेच गर्दीच्या काळात विशेष पोलिस पथक तैनात करून चोरीच्या घटनांना प्रतिबंध करावा, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

एकीकडे बाजारातील वाढती गर्दी, दुसरीकडे वाहतूक कोंडी आणि अशा परिस्थितीत निर्माण होणाऱ्या चोरीच्या शक्यता, या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासन व नगरपंचायतीने संयुक्तपणे तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे. संशयित व्यक्तीला दोषी ठरविण्यापूर्वी पोलिस तपासातून वस्तुस्थिती स्पष्ट होणे आवश्यक असून, नागरिकांनीही कायदा हातात न घेता संशयित व्यक्तीला पोलिसांच्या स्वाधीन करावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.


## श्रद्धेची अनोखी आरास! दीड लक्ष स्वस्तिक फुलांनी श्री सिद्धेश्वरांचा नेत्रदीपक जलविहार शृंगार

माजलगाव । प्रतिनिधी

येथील ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर मंदिर येथे श्रावण मास उत्सवानिमित्त चौथ्या श्रावणी सोमवारी दीड लक्ष स्वस्तिक फुलांनी भगवान श्री सिद्धेश्वरांचा नेत्रदीपक जलविहार शृंगार करण्यात आला. फुलांनी साकारलेली आकर्षक आरास आणि जलविहाराचे मनोहारी रूप पाहून भाविक भक्त मंत्रमुग्ध झाले.

पंचक्रोशीत मुबलक पाऊस पडावा, शेतकरी बांधवांच्या शेतात हिरवाई नांदावी, भरघोस पीक यावे आणि सर्वांच्या जीवनात सुख, समृद्धी व समाधान नांदावे, या पवित्र संकल्पाने हा विशेष पुष्पसेवा उपक्रम राबविण्यात आला. भाविक भक्त तसेच सुकाणू समिती, श्री सिद्धेश्वर भक्त मंडळाच्या सदस्यांनी स्वतः पुढाकार घेत अवघ्या तीन दिवसांत दीड लक्ष स्वस्तिक फुले जमा केली आणि भक्तिभावाने ती भगवंताच्या चरणी अर्पण केली.

या संपूर्ण धार्मिक सोहळ्याचे नियोजन यशस्वी करण्यासाठी सुकाणू समिती, श्री सिद्धेश्वर भक्त मंडळाच्या सदस्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने विविध जबाबदाऱ्या पार पाडल्या. फुलांची उपलब्धता, संकलन, वर्गीकरण, मंदिर सजावट, भाविकांची व्यवस्था, धार्मिक कार्यक्रमांचे नियोजन तसेच



**चौथ्या श्रावणी सोमवारी विविध धार्मिक उपक्रमांनी मंदिर परिसर भक्तिमय; सुकाणू समितीच्या नियोजनातून उत्सवाची भव्य सांगता**

संपूर्ण कार्यक्रमाच्या व्यवस्थापनासाठी समितीच्या सदस्यांनी परिश्रम घेतले. सदस्यांच्या सामूहिक प्रयत्नांतून आणि सेवाभावातून हा आगळावेगळा पुष्पशृंगार भक्तिभावाने साकारण्यात आला. यावेळी शंकरगिरी मठ संस्थानचे मठाधीपती ह. भ. प. गौरीशंकर गिरी देवगिरी महाराज यांच्या अमृतवाणीत सांप्रदायिक हरिकीर्तन सेवा संपन्न झाली. महाराजांनी आपल्या ओघवत्या वाणीतून जीवन कसे जगावे, माणसाने कोणते संस्कार आणि सद्गुण अंगीकारावेत, याबाबत विविध दृष्टांत देत मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रभावी निरूपणाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले.

श्रावणी सोमवारनिमित्त सूर्योदय ते सूर्यास्त अखंड रुद्राभिषेक, महिलांच्या वतीने १०१ शिवलीलामृत अकरावा अध्याय पारायण, तसेच सुकाणू समितीच्या सदस्यांच्या वतीने एक लक्ष श्री शिवाय नमस्तुभ्य अखंड जपसेवा भक्तिभावाने संपन्न झाली. दिवसभर मंदिर परिसरात हर हर महादेवच्या जयघोषाने आणि भक्तिमय वातावरणाने परिसर दुमदुमून गेला. श्रद्धा, सेवा आणि सामूहिक नियोजनातून साकारलेल्या या धार्मिक उपक्रमामुळे चौथा श्रावणी सोमवार माजलगावकरांसाठी अविस्मरणीय ठरला.

या संपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सुकाणू समिती, श्री सिद्धेश्वर भक्त मंडळाच्या सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले. भाविक भक्तांनीही मोठ्या संख्येने सहभागी होत धार्मिक उपक्रमांचा लाभ घेतला.

## बोटावर मोजण्याइतपत हौशी शेतकऱ्यांकडेच उरल्या बैलजोड्या!

**युसूफवडगाव । प्रतिनिधी**

**आधुनिक शेतीच्या युगात शेतीची बहुतांश कामे यंत्रांच्या सहाय्याने होऊ लागल्याने शेतकऱ्यांचा वेळ आणि श्रम वाचू लागले आहेत. त्यामुळे पूर्वी बैलांच्या सहाय्याने केली जाणारी नांगरणी, वखरणी, पेरणी यांसारखी अनेक कामे आता ट्रॅक्टर व अन्य यंत्रांद्वारे केली जात आहेत. परिणामी, शेतकऱ्यांच्या गोठ्यातील बैलजोड्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे.**

एकेकाळी ग्रामीण भागातील प्रत्येक शेतकऱ्याच्या गोठ्यात बैलजोडी असायची. शेतीची बहुतांश कामे बैलांच्या सहाय्यानेच केली जात असल्याने बैल हे शेतकऱ्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग होते. मात्र, आधुनिक यांत्रिकीकरणामुळे शेतीची कामे कमी वेळेत आणि तुलनेने कमी खर्चात होऊ लागल्याने शेतकऱ्यांचा कल आधुनिक शेतीकडे वाढला.



**यांत्रिकीकरणाच्या युगात लोप पावत चालली पारंपरिक शेती; परंपरा जपण्यासाठी बैलपोळ्याचा उत्साह कायम**

युसूफवडगावमध्येही याच बदलाचे चित्र पाहायला मिळत असून, सध्या बोटावर मोजण्याइतपत हौशी शेतकऱ्यांकडेच बैलजोड्या शिल्लक राहिल्या आहेत. त्यामुळे पूर्वी गावात मोठ्या उत्साहात साजरा होणाऱ्या बैलपोळ्याचे स्वरूपही बदलले आहे. बैलांच्या संख्येत घट झाल्याने पोळयाची लगबग पूर्वीसारखी दिसत नसली तरी आपल्या पूर्वजांची परंपरा आणि ग्रामीण संस्कृती जपण्यासाठी बैलजोडी असलेले शेतकरी आजही मोठ्या प्रेमाने बैलांची सजावट करून पोळा साजरा करतात.

यंत्रांनी शेती सोपी केली असली, तरी शेतकऱ्याच्या जीवनाशी नाते जोडलेला बैल आणि त्याच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा बैलपोळा आजही ग्रामीण संस्कृतीची ओळख कायम ठेवून आहे.

## माऊली वॉर्ड ६ मधील पाणीप्रश्न सुटणार; सतीश गर्जे यांच्या मेसेजची आ.धस यांच्याकडून तात्काळ दखल

**नगराध्यक्ष राजू भैया जाधव व उपनगराध्यक्ष रोहिदास गीते यांच्याकडून प्रत्यक्ष पाहणी; दोन दिवसांत नवीन पाईपलाईन टाकण्याचे निर्देश**

पाटोदा । प्रतिनिधी

माऊली वॉर्ड क्रमांक ६ मधील नागरिकांना भेडसावणारा पिण्याच्या पाण्याचा आणि नळ कनेक्शनचा प्रश्न आता लवकरच मार्गी लागणार आहे. स्थानिक नागरिक सतीश गर्जे यांनी या समस्येबाबत आमदार सुरेश अण्णा धस यांना एसएमएस पाठवून परिसरातील पाणीटंचाईकडे लक्ष वेधले होते. लोकसमस्येची अत्यंत गांभीर्याने आणि तत्परतेने दखल घेणारे आमदार सुरेश अण्णा धस साहेब यांनी यावर तातडीने पावले उचलली.



आमदार धस साहेबांनी दिलेल्या सूचनेचे पालन करत नगराध्यक्ष राजू भैया जाधव आणि उपनगराध्यक्ष रोहिदास गीते यांनी तात्काळ माऊली वॉर्ड ६ मध्ये प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली.

पाहणीदरम्यान नगराध्यक्ष राजू भैया जाधव यांनी उपस्थित संबंधित कॉन्ट्रॅक्टरला (गुत्तेदार) उद्याच्या उद्या कामाला सुरुवात करून पुढील दोन दिवसांत नवीन पाईपलाईन टाकण्याचे कडक निर्देश दिले. त्यामुळे परिसरातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न कायमचा सुटण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

नागरिकांच्या समस्येची तातडीने दखल घेणारे कार्यतत्पर आमदार सुरेश अण्णा धस, प्रत्यक्ष घटनास्थळी धाव घेणारे नगराध्यक्ष राजू भैया जाधव आणि उपनगराध्यक्ष रोहिदास गीते यांच्या या जलद व कर्तव्यदक्ष कृतीबद्दल सतीश गर्जे व माऊली वॉर्ड ६ मधील नागरिकांनी समाधान व्यक्त करत आभार मानले आहेत.

# वडवणीत 'उमेद'च्या महिला 'ग्रामसखींचे' एल्गार; १५ दिवसांत मागण्या मान्य करा, अन्यथा ऑनलाईन कामबंद आंदोलनाचा इशारा

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील 'उमेद' महाराष्ट्र राज्य महिला व कर्मचारी कल्याणकारी संघटने'च्या वतीने 'ग्रामसखींच्या' विविध प्रलंबित मागण्यांसाठी प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले असून, मागण्या मान्य न झाल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. याबाबत संघटनेने सोमवार, दि. ७ सप्टेंबर रोजी वडवणी गटविकास अधिकारी व तहसीलदारांना निवेदन सादर केले आहे.

संघटनेच्या निवेदनानुसार, दि. ७ सप्टेंबरपासून पुढील १५ दिवसांत अथवा शासन निर्णय होईपर्यंत ऑनलाइन काम बंद आंदोलन करण्यात येणार असुन शासनाकडून मागण्यांबाबत लेखी आदेश प्राप्त होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार संघटनेने व्यक्त केला आहे.

मानधनवाढीसह विविध मागण्यांचा पाढा






'उमेद'च्या माध्यमातून ग्रामीण भागात काम करणाऱ्या महिला ग्रामसखींच्या व कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. ऑनलाइन कामासाठी चांगले टॅब उपलब्ध करून देण्याबरोबरच अतिरिक्त मानधन वाढवून देण्यात यावे, तसेच एप्रिल २०२६ पासून लागू असलेली वाढीव मानधनाची रक्कम तातडीने अदा करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

तसेच उमेद अभियानाला ग्रामविकास विभागाचा कायमस्वरूपी स्वतंत्र उपविभाग म्हणून मान्यता द्यावी तसेच उमेद च्या सर्व ग्रामसखी व कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचारी दर्जा देण्यात यावा. सर्व ग्रामसखिंच्या मासिक मानधनात वाढ करून ₹१५०००/- व प्रभाग संघाच्या पदाधिकाऱ्याचे मानधन ₹२४०००/- हजार रुपये करण्यात यावे, अशी प्रमुख मागणी आहे. याशिवाय मासिक प्रवास भत्ता तसेच अतिरिक्त कामाचे मानधन देण्याची मागणीही करण्यात आली आहे.

विनंती बदल्या, जे.पी. शिक्षण शुल्क, प्रवास व दैनिक भत्ता वाढ, , , , विमा १० लाख रुपये तसेच १० टक्के वेतनवाढ एक महिन्याच्या आत लागू करावी, अशी मागणीही संघटनेने केली आहे. तसेच सीएससी कर्मचाऱ्यांचे उमेदमध्ये समायोजन करून समान कामास समान वेतन लागू करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

लेखी आदेशाशिवाय आंदोलन मागे घेणार नाही

दरम्यान, मागण्यांबाबत शासनाकडून ठोस निर्णय घेऊन लेखी आदेश मिळेपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्यात येईल, असा स्पष्ट इशारा संघटनेने दिला आहे. त्यामुळे वडवणी तालुक्यातील 'उमेद'च्या ग्रामसंघाच्या ऑनलाइन कामावर आंदोलनाचा परिणाम होण्याची शक्यता आहे. प्रशासन या मागण्यांवर काय निर्णय घेते, याकडे तालुक्यातील संबंधित महिला व कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

यावेळी उमेद महिला कर्मचारी कल्याणकारी संघटनेच्या पदाधिकारी मीरा मस्के, अश्विनी यादव, मीरा शेळके, सनिता तिडके, सुनिता बायस, आलका यादव, रामकवर गव्हाणे, प्रियंका जोगदंड, गीता मस्के, उषा सावंत तसेच तसेच वडवणी उमेद अभियानातील सर्व ग्रामसखी यावेळी उपस्थित होत्या.

## पान ६ वरून...

### हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे

विद्यार्थ्याला प्रमाणपत्र प्रदान केले जाईल.

अ – गट (इयत्ता ५ वी ते ७ वी) :

प्रथम क्रमांक: २,१००/– रोख, स्मार्ट वॉच, शिल्ड व सहभाग प्रमाणपत्र
द्वितीय क्रमांक: १,५००/– रोख, स्मार्ट वॉच, शिल्ड व सहभाग प्रमाणपत्र
तृतीय क्रमांक: १,१०/ – रोख, स्मार्ट वॉच, शिल्ड व सहभाग प्रमाणपत्र ब – गट (इयत्ता ८ वी ते १० वी) :

प्रथम क्रमांक: ३,१००/– रोख, स्मार्ट वॉच, शिल्ड व सहभाग प्रमाणपत्र
द्वितीय क्रमांक: २,१००/– रोख, स्मार्ट वॉच, शिल्ड व सहभाग प्रमाणपत्र
तृतीय क्रमांक: १,५००/– रोख, स्मार्ट वॉच, शिल्ड व सहभाग प्रमाणपत्र
शाळेसाठी विशेष बक्षीस :

ज्या शाळेचे सर्वाधिक विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी होतील, त्या एका शाळेस ५,०००/– रोख आणि 'बाळासाहेब ठाकरे सन्मानचिन्ह' देऊन गौरवण्यात येईल. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी व अधिक माहितीसाठी खालील क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे: ९१५८९६३७३७,९६९६३७३७३७, ९८९०१५३३११

पर्यावरणरक्षणाचा संदेश देणाऱ्या या अनोख्या स्पर्धेत बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक उल्हास गिराम व सौ. मनीषा गिराम यांनी केले आहे.

### कडा कृ.उ.बा. समितीच्या सभापतीपदी

पत्रकारांशी बोलताना नवनिर्वाचित सभापती संजयनाना ढोबळे म्हणाले, पदभार स्वीकारल्यानंतर आमचे नेते आमदार सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सर्व संचालक मंडळाच्या सहकार्याने शेतकरी भवन उभारण्यासाठी विशेष प्रयत्न करणार आहे. तसेच बाजार समितीच्या आवारातील सर्व रस्ते सिमेंट काँक्रेट करण्याला प्राधान्य दिले जाईल. शेतकऱ्यांच्या हिताला केंद्रस्थानी ठेवून बाजार समितीच्या विकासासाठी काम केले जाईल. निवडणूक प्रक्रिया आष्टीच्या सहाय्यक निबंधक पूजा सांगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. त्यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले. बाजार समितीचे सचिव हनुमंत गळगटे यांनी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जबाबदारी पार पाडली.

पदाधिकारी निवडीसाठी आयोजित विशेष बैठकीस मावळते सभापती रमजान तांबोळी, उपसभापती नामदेव धोंडे तसेच संचालक अशोक पवार, बाबासाहेब शेकडे, राजेंद्र गव्हाणे, मधुकर सायंबर, अण्णासाहेब लांबडे, मुरलीधर फसले, पंडित पोकळे, जयश्री तळेकर, छायाबाई लगड, बेबीनंदा नागरगोजे, वंदना गायकवाड, मधुकर राम, संजय मेहेर आदी उपस्थित होते. कडा बाजार समितीच्या नेतृत्वाची धुरा आता संजयनाना ढोबळे आणि रामदास शेंडगे यांच्या खांद्यावर आली असून, शेतकरी भवन, बाजार समितीतील पायाभूत सुविधा आणि शेतकरी हिताच्या कामांना नव्या पदाधिकाऱ्यांकडून गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

### जातीवाचक शिवीगाळ करत

चिंचणव येथे पोलिसांकडून पाठवण्यात आले होते.औषध उपचार केल्यानंतर सहा सप्टेंबर रोजी संध्याकाळी गोविंद आजबे व त्यांच्या पत्नी विरुद्ध जातिवादक स्वीकार करत जीव मारण्याची धमकी देत मारहाण केल्या प्रकरणी वडवणी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे या घटनेचा तपास माजलगाव उपविभागीय पोलीस अधिकारी हे करत आहेत.

### रस्ता पूर्ण होण्यापूर्वीच

दर्जा कशा राहील? हा मोठा प्रश्न आहे. जो रस्ता होणार आहे त्याचाही दर्जा असाच राहिला तर हा रस्ता किती दिवस टिकणार हा मोठा प्रश्न आहे. या रस्त्याच्या कामाची संबंधित विभागाच्या वतीने चौकशी करावी आणि काम दर्जेदार व्हावे यासाठी अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक लक्ष द्यावे अशी मागणी परिसरातील नागरिक करत आहेत.

### आष्टीतील दोन महत्त्वाच्या ठिकाणी

कामांसाठी सातत्याने आष्टी शहरात ये–जा करावी लागते. त्यामुळे या मार्गावर पादचाऱ्यांची मोठी वर्दळ असते. महामार्गावरील वाढती वाहतूक लक्षात घेता या नागरिकांसाठी सुरक्षितपणे रस्ता ओलांडण्यासाठी स्वतंत्र स्कायवॉकची आवश्यकता असल्याचे आ. धस यांनी स्पष्ट केले.या पार्श्वभूमीवर जिल्हा नियोजन व विकास समितीच्या निधीतून विशेष बाब म्हणून आवश्यक निधीची तरतूद करून दोन्ही स्कायवॉकच्या बांधकामास मंजुरी देण्यात यावी, अशी मागणी आ. सुरेश धस यांनी केली.

### गोशाळेत पोहोचलेली

मधील सर्व प्रकरणांचे ऑडिट करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.गोवंशाच्या नावावर कारवाई करून फाईल बंद करणे पुरेसे नाही; जप्त केलेल्या प्रत्येक जनावराचा जप्तीपासून आजपर्यंतचा हिशोब पोलीस प्रशासनाने द्यायलाच हवा. हिशोबात पारदर्शकता असेल तर चौकशीला भीती कसली? असा थेट सवालही या निमित्ताने उपस्थित केला जात आहे. याच अनुषंगाने वंचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी पोलीस अधीक्षक नवनीत गावत यांच्याकडे ई–मेलद्वारे तक्रार देत मागणी केली आहे.

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

नोंदवण्याची सुविधा देण्यात आली आहे. ७ सप्टेंबर २०२६ पर्यंत प्राप्त झालेल्या आकडेवारीनुसार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि राष्ट्रीयकृत बँकांच्या संदर्भात जिल्हास्तरावर एकूण २६७ तक्रारी आणि तालुकास्तरावर ४७ तक्रारी प्रलंबित आहेत. अशी माहिती यावेळी देण्यात आली. प्रशासनाने इतर शेतकऱ्यांनाही त्यांचे फार्मर आयडी प्राप्त करण्याचे तसेच आपले आधार प्रमाणीकरण तातडीने पूर्ण करण्याचे आवाहनही केले आहे.

### अनुभवी व विकासाभिमुख त्र्यंबक

यांच्या वतीने त्र्यंबक कांबळे यांचे आज स्वागत करण्यात आले असून यावेळी बाजीराव भैय्या धर्माधिकारी, राजा खान पठाण, अय्युब भाई पठाण, जयपाल लाहोटी, शकील कुरेशी, नगरसेवक अनंत इंगळे,ईस्माईल पटेल,दीपक मुंडे, रमेश पवार, पिंटू मुरकुटे, हाजी बाबा, भीमराव डावरे, सचिन सारडा, हसन भाईरवींद्र परदेशी, अजीज कच्छी, रमेश भोईटे, दत्ता सावंत, दीपक कुरिल आदी उपस्थित होते.

# राज्यात त पावसाच्या कमतरतेमुळे खरीप हंगामात बदल

## ३१ जिल्ह्यांमधील पिकांना मोठा धोका! सोयाबीन, कापूस आणि तूर पिकांवर परिणाम



पुणे : महाराष्ट्रात ९४% खरीप पेरणी पूर्ण झाल्यानंतर, दीर्घकाळच्या पावसाच्या कमतरतेमुळे पिकांविषयी चिंता वाढली आहे. ३१ जिल्ह्यांमध्ये सोयाबीन, कापूस आणि तूर पिकांवर परिणाम झाला आहे.जुलैमध्ये झालेल्या पावसामुळे, यावर्षीच्या खरीप हंगामात महाराष्ट्रात ९४% पेरणी पूर्ण झाली. सुरुवातीच्या टप्प्यात बहुतांश भागांमध्ये पिकांची वाढ चांगली झाली असली तरी, पिकांच्या वाढीच्या महत्त्वाच्या काळात ४०% ते ८९% पावसाच्या तुटीमुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

महिन्याच्या अखेरीस, पावसाच्या कमतरतेचा पिकांवर परिणाम होऊ लागला. गेल्या २५ दिवसांपासून खानदेशच्या धुळे, नंदुरबार आणि जळगाव या तीन प्रमुख जिल्ह्यांमध्ये पाऊस झालेला नाही. यामुळे सुमारे १४ लाख हेक्टर क्षेत्रातील खरीप पिकांना धोका निर्माण झाला आहे. सततचे ढगाळ वातावरण आणि पावसाच्या कमतरतेमुळे पिकांवरील कीड आणि रोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे. यामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च लक्षणीयरीत्या वाढला आहे. ऑगस्ट महिन्यात पश्चिम विदर्भ, मराठवाडा, खानदेश, पूर्व अहिल्यानगर आणि मध्य व उत्तर महाराष्ट्रातील काही तालुक्यांमध्ये पिकांच्या वाढीसाठी आवश्यक पाऊस झाला नाही.ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात थांबलेला पाऊस अद्याप परत आलेला नाही. याचा सर्वाधिक गंभीर परिणाम सुमारे ५० लाख हेक्टरवर पेरलेल्या सोयाबीन पिकावर झाला आहे. यामुळे सोयाबीन उत्पादक भागातील शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. यावर्षी, विदर्भात ऑगस्ट अखेरपर्यंत एकूण ५० लाख ४ हजार हेक्टरवर खरीप पिकांची पेरणी झाली होती. कापूस, सोयाबीन, भात, मूग, उडीद, ज्वारी, मका आणि तूर यांसारख्या पिकांची पेरणी करण्यात आली. पूर्व विदर्भातील भंडारा, गोंदिया आणि गडचिरोली वगळता, उर्वरित विदर्भात ऑगस्ट महिन्यात पावसाने मोठा खंड पाडला. यामुळे जवळपास सर्व प्रमुख पिके धोक्यात आली आहेत. तसेच महाराष्ट्रातील मराठवाड्यात ४८,२१,००० हेक्टर जमिनीवर पेरणी करण्यात आली. कापूस, सोयाबीन, बाजरी, मका, तूर, मूग आणि उडीद यांसारख्या पिकांची पेरणी झाली आहे. सध्या सोयाबीन, तूर आणि कापसाची पिके कोमेजून जात आहेत. कीड आणि रोगांचा प्रादुर्भावही वाढला आहे. आपली पिके वाया जाण्याची शेतकऱ्यांची चिंता वाढत आहे.

# तूर पिकाच्या योग्य वाढीसाठी हे करा



तूर कमी पावसात तग धरणारे पीक असले तरी यंदाच्या अनियमित पावसामुळे, ढगाळ हवामानामुळे तुर पिकाची वाढ हवी तशी जोमदार दिसत नाही. परंतु योग्य लागवड, तूर पिकाच्या वयानुसार संरक्षित ओलित, अन्नद्रव्यांचे नियोजन करुन पिकाची वाढ पूर्ववत करणे शक्य आहे.तूर हे जास्त महिन्यांचे पीक असते. त्यामुळे त्याची लागवड ही सरी वरंब्यावर करण्याची शिफारस तज्ज्ञांकडून केली जाते. त्यामुळे कमी पावसातही वरंब्यांमध्ये मातीचा ओलावा जपला जातो. तसेच जास्त पावसात पाण्याचा सऱ्यांमधून निचरा होतो. तूर हे कमी पावसात तग धरते. परंतु पावसाचा मोठा खंड पडल्यास पिकाला संरक्षित ओलित देण्याचा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे. तुरीची वाढ जोमदार दिसत नसल्यास पिकाला फांद्या फुटण्याच्या अवस्थेत किंवा फुलोऱ्यापूर्वी सूक्ष्म अन्नद्रव्ये ग्रेड १० ची ०.५ टक्के फवारणी करावी. यामध्ये ५ मिलि प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. तसेच फुलोऱ्यानंतर १ टक्का फवारणी म्हणजेच १० मिलि प्रति लिटर पाण्यात फवारणी करावी. यामुळे पिकाला सर्व सहा सूक्ष्म अन्नद्रव्यांचा पुरवठा होतो आणि पिकाची वाढ जोमदार होते. तूर हे जास्त दिवसांचे पीक असल्याने त्याला खतांच्या मात्रा योग्य प्रमाणात द्याव्यात. पिकाच्या वाढीमध्ये सर्वात महत्त्वाची भूमिका बजावते नत्र. त्यामुळे पिकाची वाढ खुंटलेली असेल, पीक निस्तेज दिसत असेल, पिवळे पडले असेल, पाण्याचा ताण पिकावर आला असेल तर अशा अवस्थेत २ टक्के युरिया किंवा डिएपीची म्हणजेच २० ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. याशिवाय अनेक शेतकरी तूर पिकासोबत आंतरपिकाची लागवड करतात. यामध्ये सहसा सोयाबीनला प्राधान्य दिले जाते. सोयाबीन हे कमी दिवसांचे पीक आहे. त्याची काढणी केल्यावर तुरीला पुन्हा २ टक्के युरिया किंवा डिएपीची म्हणजेच २० ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. जेणेकरुन तुरीच्या वाढीला चालना मिळेल. सोयाबीनच्या शेंग्या भरण्याच्या अवस्थेपासून काढणीपर्यंत तुरीला कोणतीही नत्राची फवारणी केलेली नसते. त्यामुळे सोयाबीनच्या काढणीनंतर २ टक्के युरिया किंवा डिएपीची फवारणी उत्पादनवाढीसाठी मदत करु शकते, असा सल्ला डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठातील कडधान्य संशोधन केंद्रातील वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ डॉ. विजयकुमार गावंडे यांनी दिला आहे.

# कांकरेज गाय' :दूध उत्पादन व शेतकामासाठी बैल उपयुक्त

काही गायीच्या जाती एवढ्या लोभस असतात की बघताक्षणीच त्या आकर्षित करतात. अशीच गायीची एक जात म्हणजे 'कांकरेज गाय'. दूध उत्पादन व शेतकाम अशा दुहेरी कामासाठी या जातीची गाय आणि बैल उपयुक्त ठरतो.

उगम : या जातीच्या गायी प्रामुख्याने गुजरातच्या कच्छ रण आणि राजस्थान मध्ये मोठ्या प्रमाणात आढळतात.

शारीरिक वैशिष्ट्ये : या गायीचा रंग सिल्व्हर राखाडी किंवा स्टील राखाडी असतो. त्यांची शिंगे लांब आणि दिसायला मजबूत, तीक्ष्ण आणि वीणेच्या आकाराची असतात, जी कोणालाही सहजपणे दुखवू शकतात. या गायीची उंची सुमारे १२५ सेमी आहे, तर बैलांची उंची १५८ सेमी आहे. कांकरेज गायीचे वजन ३२० ते ३७० किलो पर्यंत असते. पूर्ण वाढ झालेल्या बैलाचे वजन ५०० ते ५५० कि.ग्रॅ असते.

प्रजोत्पादन आणि दूध उत्पादन : या गायीचे प्रथम माजावर येण्याचे वय सुमारे ३० ते ३६ महिने एवढे असते.

या गायींचा दूध देण्याचा कालावधी २७० ते ३०० दिवस असून, एका वेतात १७५० ते १८०० लिटर दूध देतात. दिवसाकाठी सर्वसाधारण ६ ते ७ लिटर दूध सहज देतात. या गायीचे सरासरी आयुष्य २० ते २२ वर्ष असते.

इतर वैशिष्ट्ये : भारतीय गायीमधील प्रथम बघताचक्षणी प्रेमात पडावे असा लोभस गोवंश म्हणजे कांकरेज गोवंश होय. ह्या गायीने त्याच्या अंगच्या गुणवत्तेने परदेशीयांना सुद्धा संशोधन करण्यास भाग पाडले आहे. आर्यांनी ज्यावेळी आक्रमण केले त्यावेळी त्यांच्या बरोबर असलेला गोवंश म्हणून या गायीची नोंद आहे. कमी पावसाच्या प्रदेशात निकृष्ट अन्नावर पोषण होऊन देखील उत्तम गुणवत्ता सिद्ध करणे हे या गायीचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. सरकारने या गायीचे महत्त्व जाणून पोस्टाचे रु. ३/- चे टपालाचे तिकीट काढले आहे.



# तोंडली लागवडीची संपूर्ण माहिती



तोंडली लागवड व्यवसाय आणि घरगुती वापरासाठी अत्यंत फायदेशीर आहे, कारण तोंडल्याला बाजारात वर्षभर मागणी असते. तोंडल्याचे वेल एकदा लावले की साधारण ३ ते ४ वर्षे सातत्याने उत्पादन देतात. तोंडली लागवडीची संपूर्ण माहिती आज आपण पाहणार आहोत.

हवामान आणि जमीन : हवामान: तोंडल्याला उष्ण आणि दमट हवामान जास्त मानवते. जास्त थंडीमध्ये वेलांची वाढ खुंटते. चांगला निचरा होणारी, सुपीक आणि मध्यम ते काळी जमीन या पिकासाठी उत्तम असते. जमिनीचा सामू () ६.५ ते ७.५ च्या दरम्यान असावा.

लागवडीची पद्धत आणि वेळ : तोंडल्याची लागवड प्रामुख्याने जून-जुलै (पावसाळा) किंवा जानेवारी-फेब्रुवारी (उन्हाळा) या महिन्यांत केली जाते. तोंडल्याची लागवड बियांपासून न करता वेलाच्या छाट कलमांपासून केली जाते. यासाठी चांगल्या उत्पादन देणाऱ्या जुन्या वेलाचे २ ते ३ डोळे असलेले साधारण ३० सेमी लांबीचे तुकडे घ्यावेत. दोन ओळींमधील अंतर २ ते २.५ मीटर आणि दोन वेलांमधील अंतर १ ते १.५ मीटर ठेवून खड्डे करावेत आणि त्यात कलमे लावावीत.

मांडव पद्धत (सर्वात महत्त्वाचे) : तोंडली हे वेलीवर्गीय पीक असल्याने याला मांडव करणे अत्यंत आवश्यक आहे. बांबू आणि तारेच्या साहाय्याने २ मीटर उंचीचा मांडव तयार करावा. वेल जमिनीवर पसरू न देता मांडवावर चढवल्यास फळांना चांगला सूर्यप्रकाश मिळतो, फळे सडत नाहीत आणि उत्पादन दुप्पट मिळते.

खत आणि पाणी व्यवस्थापन : खत: लागवडीच्या वेळी प्रत्येक खड्ड्यात भरपूर शेणखत, १ चमचा सिंगल सुपर फॉस्फेट आणि निंबोळी पेंड टाकावी. वेलाची वाढ सुरू झाल्यावर दर ३ महिन्यांनी नत्र खताचा हप्ता द्यावा. पावसाळ्यात गरजेनुसार पाणी द्यावे. उन्हाळ्यात मात्र जमिनीच्या मगदुरानुसार ४ ते ६ दिवसांच्या अंतराने नियमित पाणी देणे गरजेचे आहे (ठिबक सिंचन/ चा वापर उत्तम ठरतो).

काढणी आणि उत्पादन : लागवड केल्यापासून साधारण ३ महिन्यांत तोंडल्याची तोडणी सुरू होते. फळे कोवळी आणि गडद हिरवी असतानाच त्यांची तोडणी करावी. भाजी निब्बर किंवा पिवळी पडू देऊ नये. एकदा तोडणी सुरू झाली की दर ३ ते ४ दिवसांनी काढणी करावी लागते. एका एकरातून वर्षाला साधारण १० ते १५ टनांपर्यंत उत्पादन मिळू शकते.




### महत्वाच्या घटना

१५४३ : नऊ महिने वयाची मेरी स्टुअर्ट ही स्कॉटलंडची राणी बनली.
१७७६ : अमेरीकेतोल कॉन्टिनेंटल काँग्रेसने ''औपचारिकरित्या 'सयुक्त वसाहती' हे नाव बदलून ''युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका'' असे ठेवले.
१७९१ : वॉशिंग्टन डी.सी हे शहर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या नावावर ठेवण्यात आले.
१८३९ : जॉन हर्षेल याने जगातील पहिले छायाचित्र काचेच्या पट्टीवर घेतले.
१८५० : कॅलिफोर्निया हे अमेरिकेचे ३१ वे राज्य बनले.
१९२० : साली अलीगढ येथील एंग्लो ओरिएंटल महाविद्यालयाचे रुपांतर मुस्लिम विश्वविद्यालयात झाले.
१९३९ : मुंबईच्या 'सेंट्रल' सिनेमामधे 'प्रभात'चा 'माणूस' हा चित्रपट प्रदर्शित झाला. फिल्म जर्नॅलिस्टस असोसिएशनने १९३९ सालातील सर्वोत्कृष्ट चित्रपट असा बहुमान त्याला दिला.
१९४५ : दुसरे चीन जपान युद्ध जपानने चीनसमोर शरणागती पत्करली.
१९९० : श्रीलंकन सैन्याने बट्टिकलोआ येथे १८४ तामिळींची हत्या केली.
१९९१ : ताजिकिस्तानने आपण (सोविएत युनियनपासुन) स्वतंत्र असल्याचे घोषित केले.
१९९७ : सात वेळा राष्ट्रीय विजेतेपद मिळवलेल्या प्रवीण ठिपसे याला बुद्धिबळातील सर्वोच्च असा 'ग्रँडमास्टर' किताब देण्याची घोषणा जागतिक बुद्धिबळ महासंघाने केली.
१९८५ : मूकबधिर जलतरणपटू तारानाथ शेणॉय याने तिसर्यांदा इंग्लिश खाडी पोहून पार करुन विक्रम केला.
२००१ : व्हेनिस येथील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात मीरा नायर दिग्दर्शित 'मॉन्सून वेडींग' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा 'गोल्डन लायन' पुरस्कार मिळाला.
२००९ : ठीक ९ वाजुन ९ मिनिटे व ९ सेकंदांनी 'दुबई मेट्रो'चे उद्घाटन झाले.
२०१५ : एलिझाबेथ (दुसरी) युनायटेड किंग्डम वर सगळ्यात जास्त काळ राज्य करणारी राणी बनली.
२०१६ : उत्तर कोरियाने पाचवी अण्वस्त्र चाचणी पूर्ण केली आहे.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२८ : लिओ टॉलस्टॉय रशियन लेखक (मृत्यू: २० नोव्हेंबर १९१०)
१८५० : भारतेंदू हरिश्चंद्र आधुनिक हिन्दी साहित्याचे जनक मानले जाणारे हिन्दी साहित्यिक, १८५० ते १९०० हा काळ हिन्दी साहित्यात 'भारतेंदू काळ' म्हणून ओळखला जातो. (मृत्यू: ६ जानेवारी १८८५)
१८७४ : प्रसिद्ध भारतीय ओडिया भाषिक लेखक आणि भाषातज्ञ गोपालचंद्र प्रहराज यांचा जन्मदिन.
१८९० : कर्नल सँडर्स 'केंटुकी फ्राईड चिकन' चे संस्थापक (मृत्यू: १६ डिसेंबर १९८०)
१९०४ : भारतीय-पाकिस्तानी हॉकी खेळाडू फिनोझ खान यांचा जन्म. (मृत्यू: २१ एप्रिल २००५)
१९०५ : भारतीय तत्त्वज्ञानी आणि कवी ब्रह्मारीश हुसैन शा यांचा जन्म. (मृत्यू: २४ सप्टेंबर १९८१)
१९०७ : साली राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार तसचं, सर्वोत्कृष्ट परराष्ट्रीय अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय चित्रपटसृष्टीतील एक प्रणेते निर्माता-दिग्दर्शक मेहबूब खान यांचा जन्मदिन.
१९०९ : लीला चिटणीस अभिनेत्री (मृत्यू: १४ जुलै २००३)
१९१० : नवलमल फिरोदिया गांधीवादी, स्वातंत्र्यसैनिक आणि उद्योगपती (मृत्यू: २६ मार्च १९९७)
१९३२ : प्रसिद्ध भारतीय हिंदी भाषिक रचनाकार कांती कुमार जैन यांचा जन्मदिन.
१९४१ : अबीद अली अष्टपैलू क्रिकेटपटू
१९५० : श्रीधर फडके संगीतकार
१९६७ : साली सुप्रसिद्ध भारतीय हिंदी चित्रपट अभिनेता, निर्माता, मार्शल आर्टिस्ट अक्षय कुमार यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१४३८ : एडवर्ड पोर्तुगालचा राजा (जन्म: ३१ आक्टोबर १३९१)
१९७६ : माओ त्से तुंग आधुनिक चीनचे शिल्पकार, मुत्सद्दी, मार्क्सवादी-लेनिनवादी विचारसरणीचे पुरस्कर्ते (जन्म: २६ डिसेंबर १८९३)
१९७८ : वॉर्नर ब्रदर्स चे सहस्थापक जॅक एल. वॉर्नर यांचे निधन. (जन्म: २ ऑगस्ट १८९२)
१९४७ : साली भारतातील सुविख्यात कलामर्मज्ञ तथा चिंतक आनंद कुमारस्वामी यांचे निधन.
१९४२ : स्वातंत्र्यसैनिक शिरीष कुमार यांचा गोळी लागून मृत्यू. (जन्म: २८ डिसेंबर १९२६)
१९६० : अली सिकंदर ऊर्फ 'जिगर मोरादाबादी' उर्दू कवी व शायर (जन्म: ६ एप्रिल १८९०)
१९९४ : सत्यभामाबाई पंढरपूरकर लावणीसम्राज्ञी (जन्म:)
१९९७ : आर. एस. भट 'युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया'चे पहिले अध्यक्ष (जन्म: )
१९९९ : पुरुषोत्तम दारव्हेकर नाटककार व लेखक (जन्म: १९२७)
२००१ : अफगणिस्तानचे उपराष्ट्राध्यक्ष व परराष्ट्रमंत्री अहमदशाह मसूद यांची हत्या (जन्म: २ सप्टेंबर १९५३)
२०१० : वसंत नीलकंठ गुप्ते समाजवादी कामगारनेते, लेखक व समाजवादाचे अभ्यासक (जन्म: ९ मे १९२८)
२०१२ : व्हर्गिस कुरियन भारतीय दुग्धोत्पादनातील 'धवल क्रांती'चे जनक, 'अमूल'चे संस्थापक, राष्ट्रीय दुग्धोद्योग विकास महामंडळाचे संस्थापक अध्यक्ष, पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण, रॅमन मॅगसेसे पारितोषिक विजेते (२६ नोव्हेंबर १९२१ कोहिकोड, केरळ)

# श्री संत माऊली पतसंस्थेत हजारो कोटींचा घोटाळा झाल्याचा संशय ?

## ठेवीदारांमध्ये अस्वस्थताः संचालक सुनील शिरसाट फरार !

प्रा.दादासाहेब खेडकर

पाथर्डी : पाथर्डी तिसगाव देडगाव शेवगाव पाथर्डी तेलकुडगाव भातकुडगाव ढोरजळगाव खरवंडी कासार या शाखेचा श्रीसंत माऊली पतसंस्थेचा संचालक सुनील बाबासाहेब शिरसाट वय वर्ष ३२ याने पतसंस्थेतील ठेवीदारांचे पैसे व सोने अडकल्याचा आरोप व करोडो रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा संशय ठेवीदारांमध्ये आढळल्याने पाथर्डी तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे याबाबत सविस्तर माहिती अशी की पाथर्डी व शेवगाव परिसरातील श्री संत माऊली मल्टीस्टेट निधी पतसंस्थेला एकाच कालावधीत विविध शाखांना टाळे लागल्याने ठेवीदारांकडून आपल्या ठेवींच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे ठेवीदारांच्या म्हणण्यानुसार संस्थेकडे जमा केलेल्या ठेवी / ची रक्कम तसेच काही ग्राहकांनी ठेवलेले सोने परत मिळत नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे संबंधित शाखांमध्ये चौकशी करण्यासाठी गेलेल्या ग्राहकांना कार्यालय बंद असल्याचे दिसून येत असून संबंधित व्यक्तींशी संपर्क साधण्यात अडचणी येत असल्याचे ठेवीदारांचे म्हणणे आहे मुख्य सूत्रधाराबाबत गंभीर आरोप या प्रकरणात सुनील बाबासाहेब शिरसाठ हे संस्थेचे प्रमुख सूत्रधार संचालक असल्याचा ठेवीदारांकडून आरोप केला जात असून ते सध्या संपर्कात नसल्याचा व फरार असल्याचा दावा काही ठेवीदारांकडून केला जात आहे तसेच सुनील बाबासाहेब शिरसाठ यांचे विविध राजकीय तसेच धार्मिक क्षेत्रातील व्यक्तींशी संबंध असल्याची माहिती आहे यामुळे ठेवीदारांमध्ये संताप निर्माण झाल्याने व शाखा अचानक बंद झाल्याने अनेक ठेवीदारांसमोर मोठा आर्थिक प्रश्न निर्माण झाला आहे आपल्या कष्टाची कमाई तसेच सोन्याच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त करत ठेवीदार आता पोलीस प्रशासन आणि संबंधित यंत्रणांकडे तक्रार करत आहेत ठेवीदारांनी आपल्या जवळील / पावत्या पासबुक ठेव कागदपत्रे सोन कारण केलेल्या पावत्या बँक व्यवहारांचे पुरावे आणि संस्थेशी झालेला पत्रव्यवहार सुरक्षित ठेवण्याचे आवाहन करण्यात येत आहे ठेवीदारांनी या आर्थिक गैरव्यवहाराबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० अंतर्गत केंद्रीय सहकार निबंधक सहकार आयुक्त व स्थानिक पोलीस प्रशासनाच्या मदतीने या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संस्थेच्या आर्थिक व्यवहारांची तपासणी करावी संबंधित जबाबदार व्यक्तींचा शोध घ्यावा आणि ठेवीदारांची रक्कम व सोनेतारण परतावा मिळावा यासाठी योग्य ती कार्यवाही करावी अशी मागणी केली आहे.

पाथर्डी व शेवगाव तालुक्यातील श्री संत माऊली पतसंस्थेच्या जवळपास आठ शाखेचा कारभार गेल्या तीन-चार वर्षापासून सुरू होता भगवानगड परिसरातील खरवंडी कासार येथे गेल्या एक ते दीड वर्षापासून नव्याने स्थापन झालेल्या श्री संत माऊली पतसंस्थेमध्ये ठेविदारांचे रोख रक्कम ठेवी जवळपास ३५ ते ४० लाख रुपये व ६० ते ७० लक्ष रुपयांचे सोनेतारण केल्याची माहिति आहे म्हणजे एकट्या खरवंडी कासार शाखेत ठेवीदारांचे एक कोटी रुपयांपेक्षा जास्त ठेवी गुंतल्याने कष्टकरी श्रमिक गरीब शेतकरी व्यापारी व्यावसायिक यांची फसवणूक झाल्याने ठेवीदारांमध्ये असंतोष व भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

गेल्या काही वर्षात अनेक खाजगी पतसंस्था मल्टीस्टेट निधी अर्बन यामध्ये गोरगरीब ठेवीदारांचे करोडो रुपयांचे नुकसान झाल्याचे व अनेक पतसंस्थांच्या संचालकांनी करोडो रुपयांच्या ठेवी व सोने घेऊन पतसंस्था बंद करून पोबारा केल्याच्या घटना घडल्या असूनसुद्धा ग्रामीण भागामध्ये पिग्मी एजंट पतसंस्थेचे कर्मचारी नियुक्त करून गोरगरिबांना जादा व्याजदर परतावा आमिष दाखवून शेअर मार्केटच्या धंद्यातून करोडो रुपयांना गंडा घालत आहेत विशेष बाब या खाजगी सहकारी पतसंस्था मल्टीस्टेट निधी अर्बनच्या उद्घाटनाला समाजातील प्रतिष्ठित सामाजिक राजकीय व अध्यात्मिक क्षेत्रातील मंडळी उपस्थिती लावत असल्याने गोरगरिबांची आर्थिक पिळवणूक व फसवणूक होत असल्याच्या घटना वारंवार घडत आहेत या खाजगी पतसंस्था मल्टीस्टेट अर्बन निधी यावर शासनाने कठोर कायदा करण्याची मागणी होत आहे.

## जो पर्यंत दुष्काळ घोषित होत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरूच राहील-खा. कल्याण काळे

मंठा। प्रतिनिधी




पावसा भावी मंठा तालुक्यात दुष्काळ सदृस्य परिस्थिती निर्माण झाली असून शेतकरी आर्थिक संकटात आहे. शेतकऱ्याचे सोयाबीन पीक नष्ट झाले आहे तर कपाशीचे पीक देखील हातून गेले आहे. आहे त्या पिकावर रोगराईचा प्रादुर्भाव वाढलेला असल्याने शेतकऱ्यांनी पिका करिता केलेला खर्च देखील निघणे अवघड झाले आहे. त्याकरिता सरकारने कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना अनुदान द्यावे अशी मागणी खा. कल्याण काळे यांनी केली. विविध मागण्याकरिता मंगळवारी ( ता. ८) काँग्रेसचे तालुका अध्यक्ष विवेक घारे यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती संभाजी महाराज चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत बैलगाडी मोर्चा काढण्यात आला होता.

या बैलगाडी मोर्चात खासदार कल्याण काळे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कल्याण दळे, माजी आमदार धोंडीराम राठोड, माजी जिल्हाध्यक्ष राजेभाऊ देशमुख, काँग्रेस तालुका अध्यक्ष विवेक घारे, परतुर तालुकाध्यक्ष बालासाहेब आकात, जिल्हा महासचिव शरद बोराडे, माजी तालुकाध्यक्ष निळकंठ वायाळ, शरद बोराडे, भीमशक्ती जिल्हाध्यक्ष प्रकाश घुले, नगरसेवक राजेश खंदारे, प्रदेश सरचिटणीस ओबीसी विभाग सरिता वरणकर, डॉ. शिवाजी गणगे, सुरेश पवार, रामप्रसाद जाधव, सुरेश वाव्हळे, अशोक चव्हाण यांच्यासह शेतकरी बैलगाडीसह सहभागी झाले होते. मोर्चाचा समारोप छत्रपती शिवाजी महाराज चौकात झाला. यावेळी तहसीलदार सुमन मोरे यांनी शासनाच्या वतीने निवेदन स्वीकारले. यावेळी बोलताना खासदार कल्याण काळे म्हणाले की, सध्याचे शासन सर्वच बाजूने फेल झाले असून या सरकारला शेतकरी, विद्यार्थी, गोरगरीब, लाडक्या बहिणी यांच्याकरिता पैसा नाही परंतु मोठमोठ्या आनंदाने अंबानी यांच्यासारख्या कर्जदारांना कर्ज माफ करण्याकरिता पैसा आहे. पेपर लिक, राम मंदिरातील दान चोरीचा प्रश्न याकडे लक्ष नाही. तर हे सरकार जाती-जातीत धर्माधर्मात वाद निर्माण करीत आहे. तुम्ही जातीत धर्मात भांडणे करीत रहा आम्हाला राज्य करायचे आहे ही सध्याच्या शासनाची रोज ती असून आता आपण सर्वांनी एकत्रित येऊन लढा देणे गरजेचे आहे. जोपर्यंत दुष्काळ जाहीर होत नाही तोपर्यंत हे आंदोलन सुरूच राहील. असे यावेळी खासदार काळे यांनी सांगितले.

## ना. पंकजाताई मुंडे यांची अभिनव संकल्पना ; पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी राज्यात प्रथमच भव्य 'महा गणेश मूर्ती कार्यशाळा'

- नवी मुंबईत उद्या सात हजाराहून अधिक शालेय विद्यार्थी व नागरिक होणार सहभागी
- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार शुभारंभ

मुंबई। प्रतिनिधी

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश व्यापक प्रमाणात जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या अभिनव संकल्पनेतून पर्यावरण व वातावरणीय बदल विभागातर्फे उद्या १० सप्टेंबर रोजी नवी मुंबई येथे 'पर्यावरणपूरक महा गणेश मूर्ती कार्यशाळा २०२६' आयोजित करण्यात आली आहे. साडेपाच ते सहा हजार शालेय विद्यार्थी आणि नागरिक एकाच वेळी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करणार असून, राज्यातील हा अशा स्वरूपाचा पहिलाच उपक्रम असणार आहे. ही कार्यशाळा १० सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत सिडको एक्झिबिशन अँड कन्व्हेन्शन सेंटर, वाशी, नवी मुंबई येथे होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते कार्यशाळेचा शुभारंभ होईल. मूर्तिकारांच्या मार्गदर्शनाखाली सहभागी विद्यार्थी आणि नागरिक पर्यावरणपूरक गणेशमूर्ती साकारणार आहेत. वर्षभरातील सर्व सण व उत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरे व्हावेत, यासाठी पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे गेल्या दोन दशकांपासून व्यापक जनजागृती करण्यात येत आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला चालना देण्यासाठी विविध स्पर्धा आणि उपक्रमही राबविले जात आहेत.

गणेशोत्सव हा महाराष्ट्रातील प्रमुख उत्सव आहे. गणरायाची पूजा म्हणजे निसर्गाचीच पूजा मानली जाते. गणेशपूजेत विविध वृक्षांची पाने अर्पण करण्याची परंपरा आहे. पूर्वी लाल किंवा शाडूच्या मातीच्या पर्यावरणपूरक मूर्तींचा वापर होत असे. मात्र, कालांतराने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती आणि रासायनिक रंगांचा वापर वाढल्यामुळे विसर्जनानंतर पाण्याचे प्रदूषण होते. पाण्यात शिसे, ॲल्युमिनियमसारखे जड धातू मिसळल्याने जलचरांनाही धोका निर्माण होतो. या पार्श्वभूमीवर पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत नागरिकांमध्ये सातत्याने जनजागृती केली जात आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात'मधून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले आहे. या मोहिमेला पुढे नेण्यासाठी एकाच ठिकाणी हजारो विद्यार्थी आणि नागरिकांना एकत्र आणून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याचा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या माध्यमातून पर्यावरणपूरक मूर्तींचा संदेश मोठ्या प्रमाणात जनतेपर्यंत पोहोचेल, असा विश्वास मंत्री पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केला. कार्यशाळेस उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, वनमंत्री गणेश नाईक, खासदार नरेश म्हस्के, आमदार मंदा म्हात्रे, आमदार निरंजन डावखरे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. ठाणे, पनवेल, खारघर, उलवे, मुंबई आणि नवी मुंबई परिसरातील शाळांमधील साडेपाच ते सहा हजार विद्यार्थी व नागरिक या कार्यशाळेत सहभागी होतील. या उपक्रमामुळे राज्यातील इतर स्थानिक स्वराज्य संस्था आणि शैक्षणिक संस्थांनाही अशा पद्धतीच्या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती कार्यशाळा आयोजित करण्यासाठी प्रोत्साहन मिळेल, असेही मंत्री पंकजाताई मुंडे यांनी सांगितले.

## उदगीर मध्ये परप्रांतीयांचे मोठ्या प्रमाणात वास्तव्य?

उदगीर । प्रतिनिधी

मागील काही वर्षांपासून उदगीर शहर व परिसरात तरूण परप्रांतीयांचे लोंढे मोठ्या प्रमाणावर वास्तव्यास असल्याचे दिसून येत आहे. आज(दि.८ सप्टेंबर) सकाळी उत्तर प्रदेशातील आठ ते दहा तरूणांचा ग्रुप बसस्थानकातून बाहेर पडताना दिसले. यात जवळपास सर्वच तरूण २० ते २५ वयोगटातील होते. या तरूणांना आटोचालकानी कुठे जायचे म्हणून हटकले असता ' त्या ' परप्रांतीयांनी त्यांच्या स्टाईलने 'भैय्या ' भाषेत बोलत तेथून निघून गेले. ही भैय्या मंडळी उदगीर येथे कशा साठी आली? कोणी बोलावले? कोणत्या ठिकाणी वास्तव्यास आहेत? याची खातरजमा पोलीस प्रशासनाने केली आहे का? असे एक ना अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. परप्रांतीयांचे लोंढे उदगीरला येऊन काय उपद्व्याप करतात यावर स्थानिक पोलीस प्रशासनाने लक्ष ठेवणे गरजेचे आहे.उदगीर शहर 'जर्मन बेकरी ' स्फोट घटनेनंतर जगाच्या नकाशावर आले आहे,हे येथे नमूद करावे लागत आहे. श्री गणरायाचे आगमन काही दिवसावर येऊन ठेपले आहे . उदगीरात गणेशोत्सवात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.तरी पण गुप्तहेरांच्या मदतीने बाहेरच्या लोकांवर 'करडी' नजर ठेवण्यासाठी पोलिस प्रशासनाने कंबर कसली पाहिजे. सद्या देशात अनेक शहरात आंदोलने, रास्तारोको, देशविरोधी कारवाया सुरूच आहेत.त्यामुळे शहरात बाहेर राज्यांतून आलेल्यांची सखोल चौकशी करणे क्रमप्राप्त आहे.

## बाजार समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

### मुख्यमंत्री व खा. जाधव, मा.मंत्री आ.लोणीकर यांच्या अभिनंदनचा ठराव पारित

मंठा। प्रतिनिधी



येथील कृषी उत्पन्न बाजार समिती मंठाची वार्षिक सर्वसाधारण सभा(ता.८) मंगळवार रोजी बाजार समितीच्या प्रांगणात सभापती ए.जे. बोराडे यांच्या अध्यक्षतेखाली व उपसभापती गोपाळराव बोराडे यांच्या उपस्थितीत पार पडली.सभेच्या सुरुवातीस लक्ष्मी मातेच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले. तदनंतर भारतीय कपास निगमच्या वतीने मागील पाच वर्षात सर्वाधिक कापूस भारतीय कपास निगम कडे विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांचा कापूस वेचणी मशीन,शाल,हार व श्रीफळ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.सभेच्या सुरुवातीला बाजार समिती संचालक अण्णासाहेब खंदारे यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीला नवीन बाजार समिती विकसित करण्यासाठी शासनाने ३ हेक्टर ९५ आर शासकीय गायरान जमीन नाममात्र किमतीवर दिली आहे. त्यानिमित्ताने महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री सुमित्राताई पवार,महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे,खा. संजय (बंडू) जाधव, माजी मंत्री तथा आ. बबनराव लोणीकर, सभापती ए.जे. बोराडे उपसभापती गोपाळराव बोराडे यांच्या अभिनंदनचा प्रस्ताव मांडला. त्यास सर्व संचालकांनी एक मताने सहमती देऊन अभिनंदन ठराव मंजूर केला.यानंतर सचिव रमेश बोराडे यांनी मागील वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २५ सप्टेंबर २०२५ रोजीच्या ठरावाचे वाचन करून दाखविले, ३१ ३/२०२६ अखेर आर्थिक पत्रकांचे वाचन केले. तसेच साल सन २०२६ २७ च्या अंदाज पत्रकाचे वाचन करून दाखवले व सन २०२५ २६ च्या वार्षिक अहवालाचे वाचन करून दाखवले. याप्रसंगी बाजार समितीचे संचालक प्रल्हादराव बोराडे, संतोषराव वरकड, सो ज्योती गोपाल सरकटे,डॉ. स्वाती दत्तात्रेय काकडे, श्रीमती सविता सचिन राठोड,पंजाबराव बोराडे,दत्तराव बनसोडे,बाबाराव राठोड,वैजनाथ बोराडे,यांच्यासह शेतकरी किसनराव मोरे, केशव महाराज सरकटे,नितीन राठोड,डॉ. डी.जे. काकडे,रंगनाथ आवचार,मारोतराव बोराडे,प्रताप वायाळ,दत्ता वाघमारे,विष्णू चव्हाण,भारतीय कपास निगम केंद्रप्रमुख श्री सोनवणे,निळकंठ वायाळ,पप्पू दायमा,श्रीरंग खरात,शिवाजीराव मोरे,रमेश वाघमारे, गणेश उन्हाळे,नारायणराव महाजन यांच्यासह परिसरातील शेतकरी,व्यापारी व हमाल मापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाराणा प्रतापसिंह चौकाचे काम सुरू करण्याची मागणी



अंबड। प्रतिनिधी

अंबड शहरातील महाराणा प्रतापसिहं चौकाच्या सुशोभिकरणांचे काम तात्काळ सुरू करा अशी मागणी संभाजी गुढे , बाबासाहेब घोलप यांनी मुख्याधिकारी नगरपरिषद अंबड यांच्याकडे करण्यात आली आहे.शहरातील महाराणा प्रतापसिंह चौकाचे सुशोभीकरणाच्या कामा तात्काळ करावा अशी मागणी शिवसेना शहरप्रमुख संभाजी गुढे यांनी मुख्याधिकारी नगर परिषद अंबड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. महाराणा प्रतापसिंह चौक सुशोभिकरण करण्यासाठी

बऱ्याच वर्षापासून मागणी करण्यात आली होती तसेच समाजबांधवाचे देखिल महाराणा प्रतापसिंग चौकाचे सुशोभिकरण करण्यात यावे मोठ्या प्रमाणत भावना होती.सदरील काम करण्यासाठी खुपच विलंब होत असल्याने महापुरुषांच्या चौकाचे सुशोभीकरणाचे कामे तात्काळ सुरु करण्यात यावे नसता शिवसेनेच्या वतीने अंबड नगर परिषद कार्यालय समोर तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा शिवसेनेच्या वतीने देण्यात आले तसेच त्याची निवेदन मा. ना. श्री. एकनाथ शिंदे. उपमुख्यमंत्री यांना देण्यात आले.या प्रसंगी शिवसेना शहरप्रमुख संभाजी गुढे, बाबासाहेब घोलप होते.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवरील टीका खपवून घेणार नाही

## शिवसेना खासदार डॉ. ज्योती वाघमारे यांचा जरांगे पाटील यांना इशारा

जालना। प्रतिनिधी

मराठा समाजाच्या मागण्यांबाबत सरकार संवेदनशील आहे. आंदोलन करण्याचा सगळ्यांना अधिकार आहे, मात्र यातून शिवसेना मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर यापुढे टीका केल्यास ती खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा शिवसेना खासदार डॉ. ज्योती वाघमारे यांनी मनोज जरांगे पाटील यांना दिला आहे. मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे यांनी मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. त्यांनी अडीच वर्षांच्या काळात घेतलेल्या निर्णयांचा तपशील खासदार डॉ. वाघमारे यांनी सादर केला. मुंबईत बाळासाहेब भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. खासदार डॉ. वाघमारे म्हणाल्या की, शिंदे साहेब मुख्यमंत्री असताना मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. तसेच न्यायमूर्ती शिंदे समिती, न्यायमूर्ती शुक्रे आयोग गठित करुन मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरु केली. लाखो कुणबी नोंदी तपासल्या गेल्या आणि कुणबी प्रमाणपत्र देण्याचा मार्ग मोकळा झाला. राज्यातील ५२०० अधिसंख्य पदांवरील मराठा उमेदवारांना नोकऱ्या देण्याचा निर्णय घेतला आणि त्याची अंमलबजावणी देखील केली. त्यामुळे एकनाथ शिंदे यांनी काय केलं असा प्रश्न विचारणाऱ्यांनी शिंदे साहेबांनी मराठा समाजासाठी घेतलेल्या अनेक निर्णयांकडे बघितले पाहिजे, असे खासदार डॉ. वाघमारे म्हणाल्या.

त्या पुढे म्हणाल्या की, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळातील बिनव्याजी कर्जाची मर्यादा १० लाखांवरुन १५ लाख करण्यात आली. महामंडळाकडून आतापर्यंत १६७० कोटींहून अधिक कर्ज वितरित केले असून १ लाख ७० हजारांहून अधिक मराठा बाधंवांना या योजनेचा लाभ झाला, असे त्या म्हणाल्या. मराठा आरक्षण आंदोलनातील ३६ मृतांच्या वारसांना प्रत्येकी १० लाख रुपये आणि २० मृत व्यक्तींच्या वारसांना एसटीमध्ये नोकरी दिली. ईडब्ल्यूएस, एसईबीसी, आणि ओबीसी प्रवर्गातील मुलींना वैद्यकीय व अभियांत्रिकीसह ८०० हून अधिक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी १००% फी माफी देण्यात आली. सारथी संस्थेला राज्य सरकारकडून ३०० कोटींचा निधी देण्यात आला. सारथीच्या ६ विभागीय कार्यालयासाठी आणि दोन उपकेंद्रांसाठी विनामूल्य जमीन उपलब्ध करुन दिली. तसेच पुण्यातील कार्यालयासाठी ४२ कोटींचा निधी दिला. एकनाथ शिंदे हे शेतकऱ्याच्या घरात जन्माला आलेले आणि मुख्यमंत्रीपदावर पर्यंत पोहोचलेले मराठा समाजातलेच आहेत. त्यामुळे मराठा बांधवांबाबत शिंदे साहेबांना तळमळ असून समाजाला न्याय देण्याची भूमिका आहे. मराठा समाजाच्या मूक मूर्चाला मुका मोर्चा म्हणून हिणवणारे लोक आणि दुसऱ्या बाजूला मराठा समाजाच्या कल्याणासाठी झटणारे शिंदे साहेब यांचाही विचार जरांगे यांनी केला पाहिजे. शिंदे साहेबांनी मराठा समाजासाठी घेतलेल्या निर्णयांचा आणि त्याचा समाजाला झालेल्या फायद्यांचा जरांगे यांनी अभ्यास केल्यास ते टीका थांबवतील. शिंदे साहेबांवर होणारी टीका मराठा समाज देखील सहन करणार नाही, असे खासदार डॉ. वाघमारे म्हणाल्या. मराठा समाजाच्या मागण्यांसंदर्भात सरकार संवेदनशील आहे. संवादाने प्रश्न सोडवता येतात, त्यामुळे गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राज्यातले वातावरण खराब होऊ नये. महाराष्ट्राचं सामाजिक ऐक्य आणि सामाजिक अखंडता टिकली पाहिजे, याची काळजी आपण सगळ्यांनी घेतली पाहिजे असे खासदार डॉ. वाघमारे म्हणाल्या.

धनुष्यबाण गोठवण्याची मागणी करताना लाज वाटत नाही का? : धनुष्यबाण हे केवळ निवडणुकीचं चिन्ह नाही तर मराठी माणसाचा अभिमान आहे. तो मराठी माणसाचा ताठ कणा आहे आणि प्रत्येक शिवसैनिकाचा जीव की प्राण आहे, असे खासदार डॉ. वाघमारे म्हणाल्या. बाळासाहेबांनी देवघरात धनुष्यबाण पुजला तो गोठवण्याची मागणी करताना लाज वाटत नाही का? अशी घणाघाती टीका खासदार डॉ. वाघमारे यांनी संजय राऊत यांच्यावर केली. धनुष्यबाण काँग्रेसच्या पायाशी गहाण टाकला होता तो एकनाथजी शिंदे यांनी सन्मानाने सोडवून धनुष्यबाणाची आन, बान आणि शान टिकवण्याचे काम केले. धनुष्यबाण गोठवण्याची मागणी करणाऱ्यांच्या शरिरातील रक्त गोठलं आहे, त्यांच्या रक्तातला स्वाभीमान गोठलाय, त्यांच्या रक्तातील मराठी अस्मिता गोठलीय म्हणून ते अशी मागणी करतायेत अशी टीका खासदार डॉ. वाघमारे यांनी केली.

# दूध भेसळ प्रकरणात 'तोडगा' कोणाचा? कथित आर्थिक लागेबांध्याच्या चर्चेने आष्टीत खळबळ

## भेसळीच्या पावडरीपासून कथित व्यवहारांपर्यंत चर्चा; पोलिसांच्या भूमिकेवर नागरिकांचे गंभीर प्रश्न

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी शहरात दूध भेसळीसाठी वापरली जाणारी पावडर पकडण्यात आल्याच्या प्रकरणानंतर आता या कारवाईपेक्षा त्यानंतरच्या कथित घडामोडींचीच चर्चा अधिक रंगू लागली आहे. भेसळीचा धंदा उघडकीस आल्यानंतर संबंधित काही दूध डेअरी चालकांची नावे या प्रकरणात येऊ नयेत, यासाठी 'तोडगा काढून बाजूला करतो', अशा आशयाची कथित चर्चा झाल्याची कुजबुज शहरात सुरू आहे. या कथित 'तोडग्या'मागे आर्थिक देवाणघेवाण झाल्याचे आरोपही चर्चेत असल्याने प्रकरणाने गंभीर वळण घेतले आहे.

काही डेअरी चालकांकडून मोठ्या रकमेची देवाणघेवाण झाल्याची चर्चा होत असली, तरी या आरोपांना अद्याप कोणताही अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष, स्वतंत्र आणि वरिष्ठ पातळीवर चौकशी होणे गरजेचे आहे.

दूध हा सर्वसामान्यांच्या आरोग्याशी थेट निगडित असलेला जीवनावश्यक पदार्थ आहे. त्यात भेसळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई होणे अपेक्षित असताना, जर कारवाईनंतर प्रकरण 'मॅनेज' करण्याच्या चर्चा खऱ्या असतील तर हा प्रकार केवळ कायद्याचा प्रश्न राहत नाही, तर जनतेच्या आरोग्याशी आणि प्रशासनावरील विश्वासाशी खेळ ठरतो.

> “ या घटनेबाबत आष्टीचे पोलिस निरीक्षक शरद भुतेकर यांना विचारले असता त्यांनी ५ ते ६ डेअरी चालकांची चौकशी केल्याचे सांगितले मात्र या चौकशीत नेमके हाती काय लागले? सदरील माल विक्रीपूर्वीच पकडला गेला असून गेल्या चार महिन्यांपासून ही पावडर विकली जात नसावी, अशी माहिती त्यांनी दिली.मात्र, यानंतर उपस्थित होणाऱ्या महत्त्वाच्या प्रश्नांवर पोलिस निरीक्षकांकडून ठोस उत्तर मिळाले नाही. चौकशी केलेल्या डेअरी चालकांकडून नेमकी काय माहिती मिळाली? त्यांना काही सूचना किंवा ताकीद देण्यात आली का? पकडलेल्या आरोपींच्या चौकशीत भेसळीच्या साखळीबाबत काही महत्त्वाचे धागेदोरे हाती लागले का? फरार आरोपींचा शोध कुठपर्यंत आला? या प्रश्नांवर मात्र उत्तर अनुत्तरितच राहिले. भेसळीच्या पावडरीचा तपास केवळ ती जप्त करण्यापुरता मर्यादित न राहता ती कुठून आली, कुणासाठी आली आणि तिच्या मागची संपूर्ण साखळी कोणती, याचा छडा लागणे अपेक्षित असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

भेसळीची पावडर पकडली, पण त्यामागची साखळी कुठे आहे? कारवाई झाली, मग पुढे काय झाले? कोणाची नावे वाचविण्याचा प्रयत्न झाला का? आणि झाला असेल तर त्यामागे कोणाचा हात होता? असे अनेक प्रश्न आता नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत.

जर आर्थिक व्यवहारांच्या चर्चा केवळ अफवा असतील, तर पोलिस प्रशासनाने त्या स्पष्टपणे फेटाळून लावाव्यात. मात्र, चर्चेत तथ्य असेल तर संबंधितांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी. कारण भेसळीचा पैसा मोठा की कायद्याची किंमत मोठी, याचे उत्तर आता तपासातूनच मिळायला हवे. दूध भेसळीसारख्या गंभीर प्रकरणात केवळ पावडर जप्त करून विषय संपत नाही. या भेसळीच्या मागे कोण आहे, माल कुठून येतो, कुठे वापरला जातो आणि कारवाईनंतर कोण कोणाला वाचविण्याचा प्रयत्न करतो, या संपूर्ण साखळीचा छडा लागणे आवश्यक आहे. आता नागरिकांचे लक्ष या प्रकरणाच्या पुढील तपासाकडे लागले असून, कथित आर्थिक लागेबांध्याच्या चर्चेची वरिष्ठ पोलिस अधिकारी दखल घेणार का? की या चर्चांवरही पडदा टाकला जाणार? हा प्रश्न सध्या आष्टीत चर्चेचा विषय बनला आहे.

# हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दी वर्षानिमित्त बीडमध्ये विद्यार्थ्यांसाठी 'माझा बाप्पा इकोफ्रेंडली स्पर्धा'

**माझा बाप्पा इकोफ्रेंडली स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे – नगरसेविका सौ. मनिषा गिराम, जिल्हा प्रमुख उल्हास गिराम**

बीड । प्रतिनिधी

बीड शहरात हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त शालेय विद्यार्थ्यांसाठी 'इकोफ्रेंडली गणेश मूर्ती स्पर्धा' आयोजित करण्यात आली आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे बीड जिल्हाप्रमुख उल्हास प्रकाशराव गिराम आणि बीड नगरपरिषदेच्या नगरसेविका सौ. मनीषा उल्हास गिराम यांच्या पुढाकारातून ही स्पर्धा घेतली जात आहे.

पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा व्हावा आणि विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला वाव मिळावा, हा या स्पर्धेमागील मुख्य उद्देश आहे.

स्पर्धेचे नियम व अटी :

विनामूल्य प्रवेश: ही स्पर्धा शालेय विद्यार्थ्यांसाठी पूर्णपणे विनामूल्य आहे.





घरीच मूर्ती बनवणे: विद्यार्थ्यांनी गणेशमूर्ती स्वतःच्या घरीच तयार करायची आहे.

पर्यावरणपूरक साहित्य: मूर्ती बनवण्यासाठी शाडूची माती, लाल माती किंवा कागदाचा लगदा यांसारख्या विघटनशील साहित्याचा वापर करणे बंधनकारक आहे.

साहित्य वाटप: आयोजकांकडून स्पर्धकांना कोणतेही साहित्य दिले जाणार नाही.

मूर्ती जमा करण्याचे ठिकाण व तारीख: पूर्ण झालेली मूर्ती दिनांक २० सप्टेंबर २०२६ पर्यंत शिवसेना कार्यालय, हॉटेल मैथिली शेजारी, बीड येथे जमा करायची आहे.

स्पर्धेचे गट व बक्षीसांचे स्वरूप

स्पर्धा दोन गटांत विभागण्यात आली असून आकर्षक रोख रकमा, स्मार्ट वॉच, शिल्ड व प्रमाणपत्रे दिली जाणार आहेत. तसेच प्रत्येक सहभागी ◀◀ पान ३ वर

# रस्ता पूर्ण होण्यापूर्वीच पंख्याला भेगा

## » उद्या रस्ताच खचला तर आश्चर्य वाटायला नको

बीड । प्रतिनिधी

बीड जामखेड रस्त्याचे काम सध्या जोरात सुरू आहे. राजुरी नवगण ते नायगाव या रस्त्यावर रस्ता पूर्ण होण्यापूर्वीच साईड पंख्याला भेगा पडल्या आहेत. असेच काम झाले तर उद्या रस्ता खचायला वेळ लागणार नाही. कोट्यावधी रुपये खर्च करून होणारा हा रस्ता जर अशा दर्जाचा झाला तर किती दिवस टिकणार असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.

सध्या बीड ते जामखेड रस्त्याचे काम प्रगतीपथावर आहे. बीड तालुक्यातील राजुरी नवगण ते नायगाव परिसरात रस्त्याचे काम सध्या सुरू आहे. साईड पंख्याला मोठमोठ्या भेगा पडलेल्या असतानाही ते दुरुस्त करण्याऐवजी मुख्य रस्त्याचे काम जोरात सुरू आहे. हा रस्ता झाला तर रस्त्याचा ◀◀ पान ३ वर






# कडा कृ.उ.बा. समितीच्या सभापतीपदी संजय ढोबळे; उपसभापतीपदी रामदास शेंडगे

**दोन्ही पदांसाठी प्रत्येकी एकच अर्ज; निवड अविरोध –शेतकरी भवन व सिमेंट कॉंक्रेट रस्त्यांना प्राधान्य देणार : संजय ढोबळे**

आष्टी । प्रतिनिधी

कडा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी कडा येथील संजयनाना बलभीम ढोबळे, तर उपसभापतीपदी पिंपळा येथील माजी उपसरपंच रामदास भगवान शेंडगे यांची बुधवारी (दि. ९ सप्टेंबर २०२६) अविरोध निवड झाली. दोन्ही पदांसाठी प्रत्येकी एकच अर्ज दाखल झाल्याने निवडणूक प्रक्रिया शांततेत व अविरोध पार पडली.



कडा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नवीन संचालक मंडळाची स्थापना दि. १४ मे २०२३ रोजी झाली होती. त्यावेळी रमजान तांबोळी यांची सभापतीपदी, तर नामदेव धोंडे यांची उपसभापतीपदी अविरोध निवड झाली होती. नियोजित कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर दि. २३ ऑगस्ट २०२६ रोजी दोन्ही पदाधिकाऱ्यांनी राजीनामा दिला. त्यानंतर रिक्त झालेल्या पदांसाठी बुधवारी विशेष निवडणूक घेण्यात आली.

ग्रामपंचायत सर्वसाधारण गटातून संचालक म्हणून निवडून आलेले कडा येथील संजयनाना बलभीम ढोबळे यांची सभापतीपदी निवड झाली. तर सेवा सहकारी सोसायटी (वि.जा.भ.ज.) संवर्गातून संचालक म्हणून निवडून आलेले पिंपळा येथील माजी उपसरपंच रामदास भगवान शेंडगे यांच्यावर उपसभापतीपदाची जबाबदारी सोपविण्यात आली.

रामदास शेंडगे यांनी पिंपळा ग्रामपंचायतीचे सलग १५ वर्षे उपसरपंच म्हणून काम पाहिले आहे. त्यांनी लोणी पंचायत समिती गणातून निवडणूकही लढवली होती. त्यात त्यांना निसटता पराभव पत्करावा लागला होता. आमदार सुरेश धस यांचे ते निकटवर्तीय व सक्रिय कार्यकर्ते असून, सध्या भारतीय जनता पक्षाचे गणप्रमुख म्हणून ते कार्यरत आहेत.

दरम्यान, नवनिर्वाचित सभापती संजयनाना ढोबळे यांचा बाजार समितीच्या कामकाजाचा पूर्वानुभव असून, त्यांनी यापूर्वीही बाजार समितीचे सभापतीपद भूषविले आहे. कडा ग्रामपंचायतीचे उपसरपंच म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे. त्यांच्या पत्नी विद्यमान ग्रामपंचायत सदस्य आहेत. आमदार सुरेश धस यांच्या राजकीय वाटचालीच्या सुरुवातीपासून संजयनाना ढोबळे हे त्यांच्यासोबत सक्रियपणे कार्यरत असल्याचे मानले जाते.

शेतकरी भवन आणि सिमेंट कॉंक्रेट रस्त्यांना प्राधान्य

निवडीनंतर ◀◀ पान ३ वर

# जातीवाचक शिवीगाळ करत ७५ वर्षीय महिलेला मारहाण

## वडवणी पोलीस ठाण्यात अॅट्रॉसिटी नुसार गुन्हा दाखल

वडवणी । प्रतिनिधी

गायीच्या विक्रीच्या कारणावरून झालेल्या वादातून ७५ वर्षीय महिलेला मारहाण करून जातिवाचक शिवीगाळ केल्याची घटना चिंचाळा, ता. वडवणी परिसरात घडल्याची तक्रार वडवणी पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

याबाबत कौसाबाई सोपान डावरे (वय ७५, रा. चिंचाळा, ता. वडवणी) यांनी दिनांक ६ सप्टेंबर २०२६ रोजी पोलिसांकडे तक्रार दिली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की चिंचाळा येथील रहिवासी असणाऱ्या कौसाबाई सोपान डावरे या दिनांक ६ सप्टेंबर रोजी दुपारी गावांमधून शेतात जात असताना रस्त्यातच गोविंद आजबे व त्यांची पत्नी यांनी कौसाबाई डावरे यांना रस्त्यात अडवून जातिवाचक शिवीगाळ करण्यास सुरुवात केली कौसाबाई डावरे या काही न बोलता शेतात निघून गेल्या असता गोविंद आजबे व त्याच्या पत्नीने पाठीमागे शेतात येत जातिवादक शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी देत मारहाण केली यामुळे महिलेचा हात फॅक्चर झाला.फिर्यादी यांनी पोलीस स्टेशन गाठले असते त्यांना औषध उपचारासाठी ◀◀ पान ३ वर

### अद्याप आरोपीला अटक नाही

६ सप्टेंबर रोजी मारहाणीची घटना घडल्यानंतर रात्री ट्रॉसिटी क्ट आणि विविध कलमान्वये आरोपी गोविंद आजबे व त्याच्या पत्नी विरुद्ध वडवणी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे घटना घडतात आरोपी गावातून पसार झाले असून घटनेच्या तीन दिवसानंतरही आरोपीला अद्याप अटक करण्यात आली नसल्याची माहिती आहे.

# आष्टीतील दोन महत्त्वाच्या ठिकाणी स्कायवॉक उभारण्याची आ. सुरेश धस यांची उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे मागणी

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र. ५६१ वरील वाढती वाहतूक आणि विद्यार्थ्यांसह नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेता महावीर चौक (खडकत रोड) आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक या दोन ठिकाणी स्वतंत्र स्कायवॉक अर्थात पादचारी पूल उभारण्यात यावेत, अशी मागणी आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आ.सुरेश धस यांनी केली आहे. याबाबत त्यांनी मुंबईतील देवगिरी निवासस्थानी महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.

खडकत चौक हा विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आष्टी शहरातील तसेच ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थी दररोज खडकत चौक परिसरात शिक्षणासाठी ये-जा करतात. या परिसरात प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा तसेच विविध शैक्षणिक संस्था आणि खासगी शिकवणी वर्गांचे मोठे जाळे आहे. त्यामुळे सकाळ-संध्याकाळ विद्यार्थ्यांची मोठी वर्दळ या चौकात असते. दुसरीकडे राष्ट्रीय महामार्गावरील वाहनांची वेगवान वाहतूक सुरू असल्याने विद्यार्थ्यांना महामार्ग ओलांडताना मोठा धोका निर्माण होण्याची भीती असून यापूर्वीच याठिकाणी काही अपघाताच्या घटना घडल्या आहेत.



विद्यार्थ्यांची सुरक्षित ये-जा सुनिश्चित करण्यासाठी खडकत रोडवरील महावीर चौकात स्कायवॉक उभारणे ही काळाची गरज आहे, असे आ. धस यांनी उपमुख्यमंत्री पवार यांच्या निदर्शनास आणून दिले.तसेच आष्टी शहराचे उपनगर असलेल्या मुर्शदपूर परिसरातील नागरिकांसाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकात देखील पूल आवश्यक

असून हा देखील नागरिकांच्या दैनंदिन वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचा भाग आहे. मुर्शदपूर परिसरातील मोठ्या लोकवस्तीतील नागरिकांना विविध ◀◀ पान ३ वर

# गोशाळेत पोहोचलेली जनावरे गायब तर नाहीत ना?

## 'दूध का दूध, पानी का पानी' करण्याची वेळ –अजय सरवदे

बीड । प्रतिनिधी

गोवंशाची अवैध वाहतूक रोखण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून कारवाया केल्या जातात. वाहने पकडली जातात, गुन्हे दाखल होतात आणि जनावरे गोशाळांच्या ताब्यात दिली जातात. मात्र, कारवाईनंतर जप्त केलेल्या जनावरांचे पुढे काय होते? किती जनावरे गोशाळेत पोहोचली आणि आज त्यापैकी किती प्रत्यक्ष जिवंत आहेत? या प्रश्नाचे उत्तर आता पोलीस प्रशासनाने देण्याची वेळ आली आहे.

जप्त जनावरांची संख्या, गोशाळेच्या नोंदवहीतील संख्या आणि प्रत्यक्ष गोशाळेत उपलब्ध असलेली संख्या यांची पडताळणी केल्यास मोठी तफावत समोर येऊ शकते, अशी बाब पुढे येत आहे. गोशाळेत जप्त जनावरे दाखल केल्यानंतर ती शेतकऱ्यांकडे संगोपनासाठी दिल्याचे सांगितले जाते. यासाठी आधारकार्ड व इतर कागदपत्रांच्या आधारे नोंदी केल्या जातात. मात्र, त्या जनावरांचा प्रत्यक्ष ठावठिकाणा, संगोपनाची स्थिती आणि पुढील हस्तांतरण याची पडताळणी कोण करणार?

यापेक्षाही गंभीर बाब म्हणजे, गोवंश संगोपनाच्या नावाखाली शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात रक्कम घेतली जाते का, तसेच जप्त केलेली जनावरे पुन्हा विक्रीच्या व्यवहारात जात आहेत का, याची चौकशी आवश्यक आहे. काही ठिकाणी अवैध गोवंश तस्करीशी संबंधित व्यक्ती शेतकऱ्यांच्या माध्यमातून जप्त जनावरे कमी किमतीत खरेदी करतात का, याचाही तपास होणे गरजेचे आहे.

जप्तीच्या आकड्यांपासून आजच्या संख्येपर्यंत ताळमेळ हवा!

सन २०२० ते २०२६ या कालावधीत बीड जिल्ह्यात गोवंशाच्या अवैध वाहतुकीविरोधात किती कारवाया झाल्या? किती वाहने जप्त झाली? किती जनावरे जप्त करण्यात आली? कोणत्या गोशाळांना किती जनावरे सुपूर्द करण्यात आली? त्यापैकी आज किती जनावरे संबंधित गोशाळांमध्ये आहेत? आणि शेतकऱ्यांकडे दिलेल्या जनावरांची आजची स्थिती काय आहे? या सर्व प्रश्नांची कागदोपत्री नव्हे, तर प्रत्यक्ष पडताळणी करून उत्तरे देण्याची मागणी होत आहे.

'रक्षकच भक्षक होऊ नयेत' यासाठी चौकशी समिती आवश्यक

गोवंश संरक्षणाच्या नावाखाली जर कुठेही नोंदीमध्ये फेरफार, अनधिकृत विक्री, बेकायदेशीर हस्तांतरण किंवा आर्थिक गैरव्यवहार होत असेल तर त्याचा पर्दाफाश होणे आवश्यक आहे. त्यामुळे पोलीस अधीक्षकांच्या स्तरावर स्वतंत्र विशेष चौकशी समिती गठीत करून २०२० ते २०२६ ◀◀ पान ३ वर

# अनुभवी व विकासाभिमुख त्र्यंबक कांबळे यांची नगर परिषदेच्या मुख्याधिकारी पदी नियुक्ती



परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

परळी वैद्यनाथ नगर परिषदेच्या मुख्याधिकारी पदी त्र्यंबक कांबळे यांची पुनर्नियुक्ती राज्य शासनाने केली असून यासाठी माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी पुढाकार घेतला होता. श्री कांबळे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या शिष्टमंडळाने नगर परिषदेचे गटनेते वैजनाथराव सोळंके व पदाधिकाऱ्यांनी त्यांचे आज स्वागत केले.

परळी वैद्यनाथ शहरातील प्रभू वैद्यनाथ मंदिराच्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास ३०१ कोटी रुपयांची मान्यता राज्य सरकारने दिली असून त्याअंतर्गत मंदिर व परिसरात विविध विकास कामे सुरू आहेत. त्र्यंबक कांबळे यांच्या कार्यकाळात यापैकी बहुतांश कामे सुरू करण्यात आलेली असून, त्याबाबत त्यांचा दांडगा अनुभव व कामातील बारकावे त्यांना माहीत असल्याने त्यांची पुनर्नियुक्ती करण्यात आली आहे. नगराध्यक्षा पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्या नेतृत्वाखाली शहरातील विविध कामे मार्गी लावण्यात येतील.

त्याचबरोबर नगर परिषद प्रशासक काळात कोणताही निधी उपलब्ध नसताना श्री कांबळे यांनी कुशल प्रशासक, मनमिळाऊ व्यक्तिमत्त्व म्हणून कार्यभार सांभाळून स्वच्छतेसह विविध कामे हाती घेतली होती, त्याही कामांना आता गती दिली. दरम्यान नगर परिषदेतील गटनेते वैजनाथराव सोळंके यांच्या सह राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नगरसेवक, पदाधिकारी ◀◀ पान ३ वर

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना

# जिल्ह्यातील प्रलंबित तक्रारींचे २ दिवसात निवारण करा –जिल्हाधिकारी

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या तक्रारींचे तात्काळ निवारण करण्यासाठी प्रशासनाने पावले उचलली आहेत. तरी जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर प्रलंबित असलेल्या सर्व तक्रारींचे पुढील दोन दिवसांत निवारण करण्याचे आदेश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सर्व राष्ट्रीयकृत बँकांना दिले आहेत.



जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रगती सभागृहात दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीची बैठक पार पडली. यावेळी जिल्हा उपनिबंधक सतिश तोटावार यांच्यासह जिल्ह्यातील विविध बँकांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी राष्ट्रीयकृत बँकांच्या कामकाजावर नाराजी व्यक्त केली. तसेच बँकांनी कोणत्याही परिस्थितीत आगामी दोन दिवसांत सर्व तक्रारी निकाली काढाव्यात, जेणेकरून पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होईल, असे आदेशही बैठकीत देण्यात आले. या बैठकीत जिल्ह्यातील कर्जमुक्ती योजनेचा सविस्तर आढावा घेण्यात आला आणि प्रलंबित प्रकरणावर चर्चा करण्यात आली.

बीड जिल्ह्यातील एकूण २,२७,१२८ थकीत कर्ज असलेल्या शेतकऱ्यांची माहिती योजनेच्या विशेष पोर्टलवर भरण्यात आली आहे. यापैकी ९६,५२३ शेतकऱ्यांची पहिली यादी पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. प्रसिद्ध यादीतील ७९,६८१ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण यशस्वीरित्या पूर्ण झाले आहे. अद्याप १६,८४२ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण झालेले नाही. आधार प्रमाणीकरण प्रलंबित असलेल्या शेतकऱ्यांपैकी ८,३०५ शेतकऱ्यांनी अजूनही त्यांचा फार्मर प्राप्त करून घेतलेला नाही, ज्यामुळे त्यांचे प्रमाणीकरण रखडले आहे. या योजनेचा लाभ घेताना शेतकऱ्यांना येणाऱ्या विविध अडचणींवर ऑनलाइन पोर्टलद्वारे तक्रारी ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26